
वर्ष : अठरावे
फेब्रुवारी २०२६
अंक : दुसरा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५२

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ


हे आहे एक देखणं 'कोलाज'.
त्याला कॅन्व्हास लाभला आहे एका प्रतिभावान, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा.
आकाशवाणीपासून प्रकाशवाणीपर्यंत, रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत
आपल्या लेखणीचा अन् कॅमेऱ्याचा अमिट ठसा उमटवणारे
हे व्यक्तिमत्त्व म्हणजे सई परांजपे.
सईंनी आपल्या भ्रमंतीच्या अन् स्वप्नरंजनाच्या
विविध आविष्कारांना शब्दबद्ध करून साकारलेलं हे कोलाज म्हणजे -



ज्याने संपूर्ण मानवजातीचे आयुष्य उलथेपालथे केले,
अख्खे जग वेठीस धरले,
जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणले तो 'कोरोना ' !
डॉ. राजेंद्र मलोसे यांनी या अदृश्य वैऱ्याबरोबर दोन हात करत,
वैद्यकीय क्षेत्रात अनुभवलेले अनेक कोविड क्षण मनावर गोंदवत सांगितलेल्या
कोविडच्या या खऱ्याखुऱ्या कहाण्या....

**'कोरोनायन'**

डॉ. राजेंद्र मलोसे



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष अठरावे :
अंक दुसरा
१५ फेब्रुवारी २०२६
मूल्य : ₹ १०/-


अनुक्रम :

- संपादकीय / ५
- श्रद्धांजली - डॉ. माधव गाडगीळ - डॉ. मंदार दातार / ९
- संवाद 'राजहंसी' लेखकांसोबतचा
  *'सेक्युलॅरिझम, धर्मस्वातंत्र्य आणि समान नागरी कायदा'* - शेषराव मोरे यांची मुलाखत - मुलाखतकार : निरंजन आगाशे / १३
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *सीता* - अरुण करमरकर / २१
- आम्हां असे अभिमान
  *ब्राह्मोस* - अभय सदावर्ते / २७
- असे जन्मले पुस्तक!
  *हरित हिंदुत्व* - दिलीप कुलकर्णी / ३१
- क... कवितेचा - राजीवलोचन पुंडलीक / ३७
- उद्गार - *निवडक शकुंतला परांजपे* - स्वप्निल जोशी / ३९
  *युद्ध नाकारणारे जग - दुर्गेश सोनार* / ४१
- राजहंसी पार / ४५
- वाचकांच्या मनातलं... / ४७

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




गिरीश कुबेर यांच्या इंग्लंड दौऱ्यातील पर्यटनाचा हा निखळ आनंदानुभव. इंग्लंडचं अंतरंग उलगडून दाखवणारी त्यांची ही सचित्र, अविस्मरणीय सफर वाचकांनाही अनोखा प्रवास घडवणारी

### साहेबाच्या देशात

गिरीश कुबेर


किंमत : ₹ ३७०/- । (ट.ख. ₹ ५०)


'नाटक म्हणजे अल्प रंगमंचसज्जा, सशक्त कथानक आणि सामर्थ्यवान भावस्पर्शी अभिनय यांच्या बळावर प्रेक्षकांना गंभीर विचार करायला लावणारं माध्यम. मराठी जनांची नाळ आजही महाराष्ट्रीय संस्कृतीशी, भाषेशी जोडलेली आहे, हे अधोरेखित करणारा इंदूरच्या रंगकर्मींचा सात दशकांचा सर्जक प्रयोग म्हणजे

### नाट्यभारती

सुनीता लोहोकरे

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)




विश्वासार्हता, कल्पकता आणि चोख आर्थिक शिस्तीच्या बळावर 'स्वरूपानंद पतसंस्थे'ची भक्कम पायाभरणी करणारे, राजकारण व वाचक चळवळीत यशस्वी मुशाफिरी करणारे दीपक पटवर्धन. सार्वजनिक जीवनातील त्यांच्या या यशस्वी प्रयत्नांचे हे प्रांजळ आत्मकथन

### सहकार 'स्वरूपा'

सुमेध वडावाला (रिसबूड)

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

## संपादकीय

रंग उगवतीचे... चैतन्याचे!

*माहिती तंत्रज्ञानानं आज कितीही गगनभरारी घेतली असली, तरी उगवतीच्या गर्भात काय दडलंय हे अजून तरी आपण कुठं ठामपणे सांगू शकतोय आणि विज्ञानानं ज्ञाताची कितीही नवी क्षितिजं ओलांडून सुखाच्या पायघड्या आपल्यापुढं घातल्या, तरी आपण आनंदयात्री होऊ शकलोयत का? वैज्ञानिक प्रगतीनं माणसाचं आयुष्य सुखासमाधानाचं झालंय की अधिक जोखमीचं? विज्ञानजगताशी जोडलेली माणसाची नाळ जाणून घेणारं आणि 'राजहंसी' विज्ञान साहित्याचा जागर करणारं हे मुक्त चिंतन...*

वाचकहो, नमस्कार.

मनात भविष्याचं आश्वासक चित्र रेखून आपण सन २०२६ या नव्या वर्षाचं स्वागत केलं आहे. या वर्षाची सुरुवातच आपल्यासाठीच्या मराठी साहित्यसृष्टीतील एका आनंदसोहळ्यानं झाली आणि तो सोहळा म्हणजे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन'. सातारा येथे संपन्न झालेल्या या ९९व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद 'राजहंसी' साहित्यिक, 'पानिपत'कार विश्वास पाटील यांनी भूषवले ही आम्हां राजहंस परिवारासाठी अभिमानास्पद आणि आनंददायी बाब आहे.

उत्साहवर्धक घटना ही झाली आपल्या मानवी आयुष्याची एक बाजू; आयुष्याचे सगळेच फासे सदैव कुठे मनाजोगे पडतात. प्रिय घटितासोबतच अप्रिय, त्रासदायक असंही काही स्वीकारत आपल्याला पुढे पुढेच जावं लागतं. थोर पर्यावरणतज्ज्ञ, पद्मभूषण आणि 'राजहंसी' लेखक प्रा. माधव गाडगीळ यांचं आपल्यातून चिरकालासाठीचं जाणं असेच मनाला चटका लावणारं आहे. हे सारं संचित सोबत घेत, एकमार्गी काळाच्या हातात हात घालून आपण पुढे मार्गस्थ झालो आहोत.

माहिती-तंत्रज्ञानानं आज कितीही गगन भरारी घेतली असली तरी उगवतीच्या गर्भात काय दडलंय हे अजून तरी आपण कुठं ठामपणे सांगू शकतोय आणि विज्ञानानं कितीही नवी क्षितिजं ओलांडून सुखाच्या पायघड्या आपल्यापुढं घातल्या तरी आपण आनंदयात्री होऊ शकलोयत का ? वैज्ञानिक प्रगतीनं माणसाचं आयुष्य सुखासमाधानाचं झालंय की अधिक जोखमीचं याचा विचार करत असतानाच असं वाटलं की 'राष्ट्रीय

विज्ञान दिना’निमित्तानं वाचकांसमोर विज्ञान साहित्यविषयक काही चिंतन ठेवावं. प्रस्तुत लेखातून विज्ञानजगताशी जोडलेली आपली नाळ आणि ‘राजहंसी’ विज्ञान साहित्य यासंदर्भानं काही गोष्टी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

आजचं एकविसावं शतक तर या विज्ञान - तंत्रज्ञानाचं, संगणकाचं आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचंच आहे. साहजिकच मानवी जीवनाचं असं एकही क्षेत्र नाही, ज्याला या नवयुगाचा स्पर्श झालेला नाही. मग त्याला मराठी साहित्यसृष्टी तरी अपवाद कशी असेल!

विज्ञानकथा, विज्ञान कादंबरी, माहितीपर लेखन, संशोधनपर लेखन या सर्व प्रकारांमधून विपुल विज्ञान साहित्य सध्या प्रकाशित होत आहे. एकीकडे डिजिटल स्वरूपात कितीही माहिती उपलब्ध असली, आंतरजालावरून क्षणार्धात सारं उपलब्ध होत असलं तरी ‘विज्ञान साहित्या’चं मोल आहेच. याचं कारण म्हणजे ते केवळ आपणास माहिती देत नाही, तर विचार करायला शिकवतं, आपल्यातील कल्पनाशक्तीला दिशा देतं, अगदी सामान्य व्यक्तीलाही वैज्ञानिक संकल्पना सोप्या भाषेत समजावून देत त्याच्यात कुतूहल जागं करतं. या अफाट जगातील अकल्पित घटना या चमत्कार, जादू नसून विज्ञानाचाच आविष्कार आहेत हे आपल्याला समजतं. मानवी मनाच्या समग्र विकसनासाठी आध्यात्मिक बाबींसमवेत यासुद्धा गोष्टी मौलिक आहेतच. अनेकांना विज्ञान म्हणजे अवघड सूत्रं, प्रयोगशाळा, गुंतागुंतीची भाषा असं वाटतं; पण जेव्हा विज्ञानकथेतून एखादा रोबोट जिवंत वाटू लागतो, अंतराळ प्रवास स्वप्न नसून शक्यता भासतो, किंवा काळप्रवासाची संकल्पना गोष्टीतून समजते, तेव्हा विज्ञान आपलंसं होतं. अशा साहित्यामुळं आज विज्ञान हे कोरडं न वाटता आपल्यासाठी अनुभवात्मक झालं आहे. आपलं दररोजचं जगणं या विज्ञानाशिवाय आपण वेगळं काढूच शकत नाही. म्हणूनच विज्ञानविषयक पुस्तकं हाही आपल्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग झाली आहेत.

विज्ञानकथा आणि विज्ञान कादंबऱ्या या प्रकारांमधून लेखक कल्पनाशक्तीच्या पंखांवर उडत भविष्याची शक्यता मांडतो. परंतु ही कल्पना निराधार नसते; तिच्या पायाशी वैज्ञानिक तत्त्वं असतात. उदा., कृत्रिम बुद्धिमत्ता, जनुकीय बदल, पर्यावरणीय संकटे, अंतराळ वसाहती या विषयांवरचं लेखन वाचकाला विचार करायला भाग पाडतं की विज्ञानाचा वापर कसा करावा? प्रगती आणि नैतिकता यांचा समतोल कसा राखावा? अशा प्रश्नांची बीजं विज्ञान साहित्यातून रुजतात. त्यामुळंच हे साहित्य आपलं केवळ मनोरंजन करत नाही, तर सामाजिक जबाबदारीची जाणीवही वाढवतं. माहितीपर विज्ञान लेखन हे विज्ञान लोकप्रिय करण्याचं प्रभावी माध्यम आहे. अवघड संकल्पना सोप्या भाषेत, उदाहरणांसह मांडल्यामुळे सर्वसामान्य वाचक विज्ञानाच्या जवळ येतो. आरोग्य, हवामान बदल, तंत्रज्ञान, अवकाश संशोधन, ऊर्जा स्रोत

यांसारख्या विषयांवरील लेख समाजाला जागरूक करतात. माहितीपर लेखनामुळे वाचक केवळ वाचक राहत नाही, तर सजग नागरिक बनतो. चुकीच्या समजुती, अंधश्रद्धा, अफवा यांना वैज्ञानिक दृष्टीनं उत्तर देण्याची ताकद त्याला मिळते.

संशोधनपर लेखन विज्ञान साहित्याचा अधिक शिस्तबद्ध आणि अभ्यासपूर्ण भाग आहे. यात निरीक्षण, प्रयोग, पुरावे आणि तर्क यांना महत्त्व असते. हे लेखन नवीन ज्ञान निर्माण करतं, आधीच्या ज्ञानाची चिकित्सा करतं आणि वैज्ञानिक पद्धतीची ओळख करून देतं. जरी हे लेखन सर्वसामान्य वाचकासाठी सोपं वाटत नसलं तरी ज्ञानाच्या प्रगतीसाठी ते अत्यावश्यक आहे. संशोधनपर साहित्यामुळंच विज्ञान शोधाच्या वाटेवर एकेक पाऊल पुढे जात आहे आणि समाजाला नव्या शोधांचा लाभ मिळत आहे.

विज्ञान साहित्याचं एक वैशिष्ट्य म्हणजे भविष्यवेधक दृष्टी. अनेक विज्ञानकथांनी पूर्वी कल्पनेत मांडलेली साधनं आज वास्तवात आली आहेत. जसं की, संवाद साधनं - अंतराळ मोहिमा - कृत्रिम अवयव इत्यादी. अनेक शास्त्रज्ञांनी लहानपणी वाचलेल्या विज्ञानकथांमुळंच संशोधन क्षेत्राची वाट धरल्याची उदाहरणं आपणास माहीत आहेत. विज्ञान साहित्य आपल्यात तर्कशुद्ध विचारसरणी विकसित करतं. हीच वैज्ञानिक वृत्ती समाजातील अंधश्रद्धा, अफवा आणि अवैज्ञानिक दाव्यांविरुद्ध वेळप्रसंगी ढाल बनून पुढे येते. म्हणूनच ‘विज्ञान साहित्य’ हे प्रबोधनाचं महत्त्वाचं साधन आहे हे आपण लक्षात ठेवायला हवं.

मराठी साहित्यसृष्टीचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, विज्ञान साहित्यानं आपलं स्वतंत्र स्थान निर्माण केलं आहे. मराठी विज्ञानकथांनी ग्रामीण-शहरी जीवन, पर्यावरणीय प्रश्न, तंत्रज्ञानाचे परिणाम या विषयांना स्पर्श करून स्थानिक वास्तव आणि जागतिक विज्ञान यांची सांगड घातली आहे. त्यामुळे ’विज्ञान साहित्य’ हे केवळ पाश्चात्त्य प्रभावातून निर्माण झालेलं नाही तर त्याची नाळ स्थानिक संस्कृतीशी नातं सांगणारीही आहे.

आपण असं म्हणू या की, विज्ञान साहित्य म्हणजे उजेडाची वाट आहे, जी आपल्याला अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून जिज्ञासेकडे आणि कल्पनेतून सत्याकडे घेऊन जाते.

इथं नोंद करताना अतिशय आनंद वाटतो की, ‘राजहंस’ने सकस आणि विपुल विज्ञान साहित्याची निर्मिती करून वाचकांसाठी ही वाट प्रशस्त केली आहे. विज्ञान साहित्याचं हे दालन समृद्ध करणाऱ्या लेखकांचे मेरूमणी आहेत ते पद्मविभूषण ‘डॉ. जयंत नारळीकर’. फ्रेड हॉएल या वैज्ञानिक प्रज्ञावंताचं शिष्य होण्याचं भाग्य ज्यांना लाभलं आणि गुरुत्वाकर्षणासारख्या विश्वनियंत्या शक्तीबद्दलचा नवा सिद्धान्त मांडून साऱ्या विज्ञानविश्वाचे लक्ष ज्यांनी वेधलं ते जयंत नारळीकर!

त्यांच्या विज्ञानविषयक संशोधनकार्याइतकंच त्यांचं विज्ञानलेखनही मौलिक आहे. आपल्या विज्ञानाधारित कल्पकतेच्या आधारे त्यांनी लिहिलेल्या विज्ञानकथा, कादंबऱ्या आदींनी मराठी साहित्यविश्वाचं दालन समृद्ध केलं आहे. प्रज्ञा आणि प्रतिभा यांची त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेली गुंफण अनेकांना स्तिमित करणारी आहे. 'आकाशाशी जडले नाते' हे त्यांचं एक महत्त्वपूर्ण पुस्तक. गणितापासून विज्ञान प्रसारापर्यंत त्यांची सतत साथसांगत केलेल्या त्यांच्या सहधर्मचारिणी डॉ. मंगला नारळीकर यांनी या पुस्तकाचा केलेला 'अ कॉस्मिक ॲडव्हेंचर' हा इंग्रजी अनुवाददेखील महत्त्वपूर्ण आहे. 'राजहंस'चा 'सृष्टी विज्ञानगाथा' हा डॉ. श्रीराम गीत लिखित एक महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणजे जयंत नारळीकरांच्या साक्षेपी संपादनाचं उत्तम उदाहरण आहे. 'नभात हसरे तारे', 'चला जाऊ अवकाश सफरीला', 'गणित आणि विज्ञान : युगायुगांची जुगलबंदी' अशी त्यांची काही स्वतंत्र अनुवादित आणि इतर सहलेखकांबरोबरची पुस्तकं हा 'राजहंस'साठी खजिनाच आहे. याशिवाय 'समग्र जयंत नारळीकर' या प्रकल्पांतर्गत त्यांच्या पाच विज्ञान कादंबऱ्या एकत्रित स्वरूपात 'राजहंस'नं प्रकाशित केल्या आहेत. या बरोबरच अभय सदावर्ते अनुवादित 'ब्राह्मोस' हे 'साहित्य अकादमी पुरस्कार'प्राप्त पुस्तक, मोहन आपटे यांची 'कृष्णविवर', 'ब्रह्मांड' यांसह १७ पुस्तकेदेखील 'राजहंस'नं प्रकाशित केली आहेत. डॉ. आनंद जोशी आणि सुबोध जावडेकरलिखित 'आपले वर्तन - आपला मेंदू', अंजली चिपलकट्टी लिखित 'माणूस 'असा' का वागतो?', सुनीत पोतनीस लिखित 'शोध बदलत्या पृथ्वीचा', डॉ. गिरीश पिंपळे लिखित 'ओळख आपल्या विश्वाची', 'कथा हबल दुर्बिणीची', सुधीर फाकटकर लिखित 'निकोला टेस्ला' अशी इतरही अनेक महत्त्वपूर्ण विज्ञानविषयक पुस्तके 'राजहंस'ने प्रकाशित केली आहेत. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या व्यक्तिमत्त्वाचा साकल्याने परिचय घडवून देणारं 'अग्निपंख' हे पुस्तकही 'राजहंस'चीच निर्मिती आहे. विज्ञानविषयक पुस्तकाची ही सूची आणखीही बरीच मोठी आहे. प्रस्तुत अंकातून यांतील बव्हंशी पुस्तकांची ओळख वाचकांना करून देण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. या पुस्तकांची खरेदी तुमचे ग्रंथालय नक्कीच समृद्ध करणारी असेल. आपण वाचक ही विज्ञानसफर वाचून आम्हाला लेखी प्रतिसाद द्याल अशी आशा करते, आपल्या वाचन व लेखन प्रवासासाठी शुभेच्छा देते आणि थांबते.


धन्यवाद.

***डॉ. प्रिया निघोजकर***
कार्यकारी संपादक

## । श्रद्धांजली ।

*जागतिक ख्यातीचे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ, पद्मभूषण प्रा. माधव गाडगीळ यांचे दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी देहावसान झाले. 'राजहंस प्रकाशन' परिवारातर्फे माधव गाडगीळ यांना आदरांजली!*
*राज्य पुरस्कारप्राप्त 'सह्याचला आणि मी - एक प्रेमकहाणी' हे त्यांचे आत्मवृत्त तसेच 'उत्क्रांती - एक महानाट्य' ही त्यांची पुस्तके राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केली आहेत; तर अ. पां. देशपांडे लिखित 'विज्ञानयात्री - माधव गाडगीळ' हेही पुस्तक 'राजहंस'कडून प्रकाशित केले आहे.*
*डॉ. माधव गाडगीळ यांचे शिष्य मंदार दातार यांनी लिहिलेला श्रद्धांजलीपर लेख येथे प्रकाशित करत आहोत.*

# युगान्त


माधव गाडगीळ

पद्मश्री, पद्मभूषण या राष्ट्रीय स्तरावरच्या सर्वोच्च आणि व्होल्व्हो इंटरनॅशनल अ‍ॅवॉर्ड, टेलर प्राईझ आणि वर्षभरापूर्वी मिळलेल्या चॅम्पियन ऑफ द अर्थ या पुरस्काराने सन्मानित असलेले प्रा. माधव गाडगीळ यांच्या निधनाने आपण एक मोठा द्रष्टा गमावला आहे. पर्यावरणशास्त्रात त्यांनी केलेल्या कामगिरीचे मोल सद्य:स्थितीला कशातही करता येणार नाही एवढे मोठे आहे. ते जसे बिनीचे जीवशास्त्रज्ञ म्हणून लोकांना माहीत आहेत, तसे उत्तुंग प्रतिभेचे लेखक म्हणूनही गेल्या काही वर्षांत त्यांचे नाव लोकांसमोर आले आहे. एकीकडे विज्ञानाचा ठोस धागा पकडून काम करत राहणे, त्यावर आधारित वैज्ञानिक प्रबंध प्रकाशित करणे तर दुसरीकडे थेट लोकांसोबत राहून प्रत्यक्ष जमिनीवर काम करणे अशी दुहेरी कामगिरी गाडगीळसरांनी आयुष्यभर मोठ्या कुशलतेने केली.

गाडगीळसरांचा जन्म पुण्यातलाच. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे ते सुपुत्र. वडिलांमुळे लहानपणापासूनच गाडगीळसर वेताळ टेकडीवर पक्षिनिरीक्षण करायला लागले आणि त्यातूनच त्यांनी श्रेष्ठ पक्षितज्ज्ञ सालीम

अली यांना त्यांनी एक पत्र लिहिले. सालीम अलींकडून मिळालेल्या उत्तराने आपण आयुष्यभर पर्यावरण क्षेत्रातच काम करायचे असे त्यांनी लहानपणापासूनच ठरवून टाकले होते. लहानपणी वडिलांच्या सोबतच त्यांच्या शेजारी राहणाऱ्या इरावती कर्वे, त्यांच्या घरी नियमित भेटायला येणाऱ्या भाऊराव पाटील यांच्यासारख्या विद्वानांच्या प्रभावातच त्यांची जडणघडण झाली. पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयात सुरुवातीचे शिक्षण आणि पदव्युत्तर शिक्षण मुंबईच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' मध्ये झाल्यावर त्यांनी अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात पीएच.डी.साठी प्रवेश घेतला. सत्तरच्या दशकात जेव्हा जीवशास्त्र हे केवळ वर्णनात्मक मानले जाई, तेव्हा गाडगीळ यांनी हार्वर्डमध्ये गणिताचा आणि संगणकाचा वापर करून जीवशास्त्रीय कोडी सोडवली. प्राण्यांच्या वागणुकीचा अभ्यास करून गेम थिअरीच्या गणितांवर आधारित शोधनिबंध लिहिले. हार्वर्डमध्ये ते आयबीएम फेलो म्हणूनही एक वर्ष होते. त्यांना तिथे प्राध्यापक पदावर कायम स्वरूपाची नेमणूक मिळत असताना व्हिएतनाम युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या धोरणांना विरोध म्हणून त्यांनी तिथे न राहता भारतात परत येऊन काम करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला ते पुण्याच्या 'महाराष्ट्र विज्ञान वर्धिनी'मध्ये रुजू झाले व पुढे बेंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' मध्ये त्यांची कारकिर्द बहरली. तेथेच त्यांनी पर्यावरण अभ्यास केंद्र स्थापन केले आणि या केंद्राच्या माध्यमातून भारतभर निसर्गाचा, पर्यावरणाचा, पर्यावरणावर आधारित समजांचा अभ्यास केला.

माझी आणि गाडगीळसरांची ओळख सन २००६मधील. त्याआधी त्यांचे नाव, त्यांचे कर्तृत्व, त्यांचे देवराई विषयातील योगदान याविषयी मी ऐकून होतो. पण नशिबाने थेट त्यांच्यासोबतच काम करायची संधी मिळाली. 'महाराष्ट्र जीन बँक' नावाच्या राज्यशासनाच्या 'राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगा'च्या प्रकल्पातून त्यांना महाराष्ट्रभर काम करायचे होते, त्या प्रकल्पावर मी 'आघारकर संशोधन संस्थे'मध्ये संशोधन साहाय्यक म्हणून रुजू झालो आणि माझे आयुष्यच बदलून गेले. तोवर वनस्पती वर्गीकरण शास्त्राचे चाकोरीबद्ध शिक्षण घेतलेल्या मला, गाडगीळसर सांगत असलेल्या अनेक संकल्पनाही एकदम नव्या होत्या. पुढची तीन वर्षे त्यांच्यासोबत महाराष्ट्रभर भटकण्यात घालवली. यादरम्यान जंगले पाहिली, स्थानिक गावसमाजांची निसर्गाप्रति असणारी जाण लक्षात आली. प्रत्यक्ष निसर्गासोबत काम करणाऱ्या अनेक लोकांचा परिचय झाला. अनेकांसोबत आयुष्यभर पुरतील असे बंध तयार झाले. या भटकंतीदरम्यान मी सरांना अनेक प्रश्न विचारत राहिलो आणि त्यांनी मोठ्या औदार्याने माझी तहान भागवली. अनेक पुस्तके मी

त्यांच्यामुळेच वाचली. जेबीएस हाल्डेन, एडवर्ड विल्सन, जॅरेड डायमंड या मंडळींची महती कळाली. आणि तोवर अभ्यासक्रमाने आमच्यापासून 'एकार्थे' लपवून ठेवलेल्या उत्क्रांतिशास्त्राची गोडी लागली.

महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पानंतरही बऱ्याच गोष्टी मी सरांसोबत एकत्र केल्या. आम्ही गोव्याच्या खाणींवर आधारित एक संशोधन प्रबंध लिहिला. 'साप्ताहिक सकाळ'मध्ये आम्ही कालिदासाच्या रघुवंशातील चौथ्या सर्गातल्या निसर्ग आणि भूगोलावर आधारित एक लेख लिहिला. आकाशवाणी किंवा इतर माध्यमांसाठी मी त्यांच्या अनेक मुलाखतीही घेतल्या. पण माझ्यासाठी त्याहीपलीकडे मोलाची संधी म्हणजे त्यांचे आत्मचरित्र असलेल्या 'सह्याचला आणि मी: एक प्रेमकहाणी' या ग्रंथाचे संपादन करण्याची अद्भुत संधी. हे पुस्तक केवळ त्यांचे आत्मचरित्र नसून भारताच्या पर्यावरणाचा गेल्या सात-आठ दशकांचा आढावा घेणारा ग्रंथ आहे. 'सह्याचला' हे नाव त्यांनी कालिदासाच्या 'रघुवंश'वरूनच घेतले आहे. त्या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात स्वत:ला मिळालेल्या पुरस्कारांची यादी घेण्याऐवजी आपले अनुभव आणि निसर्गाकडून काय शिकलो, हे सांगणे त्यांना जास्त महत्त्वाचे वाटले आहे. एकाच वेळी हे पुस्तक नऊ भारतीय भाषांमध्ये अनुवादित झाले आहे आणि हा एकार्थी विक्रमच आहे. या पुस्तकाच्या लिखाणादरम्यान मला या पुस्तकातल्या पर्यावरणाच्या संदर्भातल्या अनेक गोष्टी त्यांच्याकडून समजावून घेता आल्या, अनेक गोष्टी त्यांनी मला सविस्तरपणे उलगडून दाखवल्या.


गाडगीळसरांचे बांबूंवर विलक्षण प्रेम होते. डॉ. तेतालीसरांच्या प्रेरणेतून मेस नावाच्या एका शास्त्रीय नाव नसलेल्या बांबूला आम्ही 'सुडोऑक्सीटेनानथेरा माधवी' असे गाडगीळसरांचेच नाव दिले आहे. सरांना कवितांची, मराठी साहित्याची विलक्षण आवड होती. गेली दहा-पंधरा वर्षे सकाळमध्ये नियमाने प्रकाशित होणाऱ्या त्यांच्या लिखाणाची वाट पाहणाऱ्या वाचकांना त्यांच्या या पैलूचा चांगलाच परिचय आहे. त्यांनी मराठीतून जीवशास्त्र लिहिताना रूढ केलेले अनेक शब्द माझ्यासारख्या मराठीतून जीवशास्त्र समजून घेणाऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे आहेत. मराठी साहित्याविषयी त्यांच्याशी केलेल्या अगणित चर्चा मला खूप समृद्ध करून गेल्या आहेत. त्यांनी हाल्डेन, डायमंड, जॉन मेनाड स्मिथ यांसारख्या प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञांची आणि कवी गिरीश यांसारख्या साहित्यिकांची सही असलेली त्यांच्या संग्रहातील पुस्तके मला भेट दिली आहेत. हा केवढा मोठा ठेवा आहे हे मी वेगळे सांगायला नको.

भारतीय पर्यावरण या विषयाला गेली अनेक वर्षे समांतर शब्द असणाऱ्या प्रा. माधव गाडगीळ नावाच्या एका युगाचा हा अंत आहे.

वैज्ञानिक केवळ हस्तिदंती मखरात राहून काम करतात असा एक आरोप त्यांच्यावर वारंवार होत राहतो. मात्र आयुष्यभर स्थानिक समाज, आदिवासी, ग्रामवासी यांच्यामध्ये राहून, त्यांच्या भूमिका, त्यांच्या समस्या लक्षात घेत गाडगीळांनी निसर्गाधारित विज्ञानाची जी मांडणी केली आहे ती आजघडीला पर्यावरण ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर अतिशय मोलाची आहे.

***डॉ. मंदार दातार***
आघारकर संशोधन संस्था, पुणे
९४२०१३४१४४
*(दैनिक सकाळ, दि. ८ जानेवारी २०२६मधून साभार)*


प्राण्यांना बुद्धिमत्ता असते का? मन, भावना असते का? आत्मभान असतं का? प्राण्यांच्या वर्तनशास्त्राच्या आधारे या प्रश्नांचा धांडोळा घेणारं; शास्त्रशुद्ध पद्धतीनं, काटेकोर शब्दांत पण ललित अंगानं लिहिलेलं; प्राण्यांबद्दल कुतूहल असणाऱ्या प्रत्येकासाठीचं पुस्तक.



## आपले बुद्धिमान सोयरे

सुबोध जावडेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)



पद्मभूषण माधव गाडगीळ म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व! केवळ निसर्गप्रेमी वा निसर्ग-अभ्यासकांनाच नव्हे, तर भवतालाबद्दल कुतूहल असणाऱ्या प्रत्येकाला एका वेगळ्या विविधरंगी जगाचे दर्शन घडवणारी त्यांची जीवनसफर.

## सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी

माधव गाडगीळ

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

# संवाद ‘राजहंसी’ लेखकांसोबतचा

*‘राजहंसी’ लेखकांचे साहित्य, त्यांची सर्जनप्रक्रिया, त्यामागील प्रेरणा, वाचकांचा प्रतिसाद अशा विविध अंगांनी त्यांच्या लेखनाचे पैलू उलगडणारे हे सदर...*

## ‘घटनात्मक सेक्युलॅरिझम’ची दृष्टी देणारा ग्रंथ

*‘मुस्लीम मनाचा शोध’, ‘सावरकरांचा बुद्धिवाद आणि हिंदुत्ववाद’, ‘सावरकरांच्या समाजक्रांतीचे अंतरंग’, ‘काँग्रेसने आणि गांधींनी अखंड भारत का नाकारला?’, ‘काश्मीर : एक शापित नंदनवन’ अशा अनेक महत्त्वपूर्ण पुस्तकांचे लेखन करणारे वैचारिक लेखक शेषराव मोरे यांचे ‘सेक्युलॅरिझम, धर्मस्वातंत्र्य आणि समान नागरी कायदा’ हे महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित होत आहे. या निमित्ताने निरंजन आगाशे यांनी शेषराव मोरे यांच्याशी साधलेला हा मुक्त संवाद...*

*नमस्कार. देशासमोर जे ज्वलंत प्रश्न आहेत, त्यांवर अभ्यास करून ग्रंथ लिहावा असा तुमचा परिपाठ आहे. हा ताजा ग्रंथ तुम्हाला का लिहावासा वाटला?*

देशासमोरचा आज सर्वाधिक चर्चेचा व वादाचा विषय कोणता असेल तर तो ‘सेक्युलॅरिझम’ हा होय. देशातील विविध पक्षांच्या आघाड्या व विरोध याचा पाया हाच आहे की, कोणता पक्ष ‘सेक्युलर’ आहे आणि कोणता ‘सेक्युलर’ नाही. पण दुर्दैव असे की, ‘सेक्युलॅरिझम’चा घटनेला अभिप्रेत असणारा अर्थ कोणी सांगत नाही. स्वत:च्या सोयीनुसार



*प्रा. शेषराव मोरे*

त्याचा अर्थ घेतो. यासाठी याचा घटनात्मक अर्थ कोणता आहे, हे सांगण्यासाठी हा ग्रंथ लिहावा असे वाटले.

*'सेक्युलॅरिझम'साठी मराठीत सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता, निधर्मीपणा, राज्याला धर्म नसणे, इहवाद असे अनेक प्रतिशब्द वापरले जातात. यांपैकी तुम्हाला कोणता योग्य वाटतो?*


यांतल्या बहुतेक प्रतिशब्दांत 'धर्म' हा शब्द अंतर्भूत आहे. तेव्हा जोपर्यंत 'धर्म' म्हणजे काय हे निश्चित होत नाही, तोपर्यंत यांपैकी कोणताही शब्द घेतला तरी तो संदिग्धच राहील. तेव्हा यासाठी आधी 'धर्म' शब्दाचा अर्थ निश्चित करावा लागेल आणि जो धर्म तुम्ही मानता तो लौकिक अर्थाचा घेऊन चालणार नाही. तर घटनेला याचा जो अर्थ अभिप्रेत आहे, तोच घ्यावा लागेल आणि स्पष्टपणे सांगायचे; तर तो धर्म म्हणजे हिंदू धर्म, इस्लाम धर्म व अन्य कोणता धर्म असणार नाही.

*तुम्हाला धर्माचा कोणता अर्थ अभिप्रेत आहे?*

माझ्या अर्थाला काहीच अर्थ नाही. घटनेने सांगितलेला धर्माचा अर्थ घ्यावा लागेल. आणि घटनेच्या कलम २५मध्ये तो अर्थ आलेला आहे. तो धर्म म्हणजे पारलौकिक व आध्यात्मिक श्रद्धा ('रिलिजन') असा आहे. तो या ग्रंथात न्यायालयाच्या अनेक निवाड्यांच्या आधारांसह मी विस्ताराने सांगितलेला आहे.

*घटनेने धर्मस्वातंत्र्य देऊन जोखीम पत्करली आहे, असे तुम्हाला वाटते का?*

मुळीच नाही. धर्मस्वातंत्र्य द्यावेच लागले असते. पण ते वरील अर्थाच्या धर्माचे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. याऐवजी माझा जो विशिष्ट धर्म आहे त्याचे स्वातंत्र्य

भारताच्या सहा शेजारी देशांतील ठरावीक व्यक्तींना
भारताचे नागरिकत्व ज्या कायद्याने मिळू शकते,
त्या नव्या कायद्याच्या विविध पैलूंचा
वेध घेणारे पुस्तक -

**नागरिकत्व दुरुस्ती कायदा**

घटनात्मकता व वास्तवता

शेषराव मोरे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

मला मिळाले आहे, असे मानणार असाल तर मात्र ती जोखीम आहे. तसा अर्थ घेतला तर राज्यघटनाच रद्द करून धर्मग्रंथांचे राज्य आणावे लागेल.

*घटनेत मुळात 'सेक्युलर' शब्दच नव्हता. तो आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी घटनेच्या प्रास्ताविकात आणला हे खरे आहे काय?*

घटनेत मुळात 'सेक्युलर' शब्दच नव्हता, हे म्हणणेच खरे नाही. तो पहिल्या दिवसापासून घटनेच्या धर्मस्वातंत्र्य प्रदान करण्याच्या 'कलम २५'मध्ये आलेला आहे आणि त्यात त्याचा स्पष्ट अर्थही आला आहे. घटनेतील २५व्या कलमात आलेल्या धर्म (रिलिजन) व 'सेक्युलर' या शब्दाचा अर्थच समजून न घेतल्यामुळे सेक्युलॅरिझमच्या अर्थाचा गोंधळ उडालेला आहे. तोच घटनेतील अर्थ मी अनेक न्यायालयीन निवाड्यांसह ग्रंथात मांडला आहे.


*मग मराठीत 'सेक्युलॅरिझम'साठी कोणता प्रतिशब्द वापरायचा?*

'सेक्युलॅरिझम' ही एक संकल्पना आहे. त्यासाठी मराठीत एकही योग्य प्रतिशब्द सापडत नाही. त्याची व्याख्याच करावी लागते. ती अशी की, व्यक्तीला घटनेत सांगितलेल्या अटींच्या अधीन राहून 'रिलिजन' या अर्थाच्या धर्मपालनाचे स्वातंत्र्य राहील आणि त्याच्या इहलौकिक जीवनासाठी कायदे करण्याचा राज्याला संपूर्ण अधिकार असेल; याच्याआड धर्म येऊ शकणार नाही. यासच 'सेक्युलॅरिझम' म्हणतात. धर्माचा अर्थ 'रिलिजन' असा घेतला तर वरीलपैकी कोणताही प्रतिशब्द चालू शकतो. परंतु व्यवहारात आपण असा मर्यादित अर्थ घेत नाही. म्हणून वरीलपैकी कोणताही शब्द योग्य ठरत नाही.


गांधीहत्येच्या आरोपातून सावरकरांना न्यायालयाने पूर्णपणे निर्दोष ठरवले, तरीही त्यांच्या बदनामीची मोहीम कशी चालू आहे? त्यांच्याविरुद्ध न्यायालयात पुरावा तरी कोणता होता? अशा प्रश्नांचा कायदा, वास्तव, तर्क व न्यायबुद्धी यांच्या आधारे अभ्यासपूर्ण चिकित्सा करणारा ग्रंथ

**गांधीहत्या आणि सावरकरांची बदनामी**

शेषराव मोरे




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४२५/- । (ट.ख. ₹ ५०)

*सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक याचिकेसंबंधात निवाडा देताना 'हिंदुत्व' ही जीवनपद्धती आहे, असे म्हटले आहे. तो अर्थ याच्याविरोधी होत नाही काय?*

न्यायालयाने त्यांचा निवाडा म्हणून असा अर्थ दिला आहे, हा एक पसरलेला गैरसमज आहे. हिंदुत्वाच्या अनेक प्रचलित अर्थांपैकी जीवनपद्धती हाही एक अर्थ आहे, असे न्यायालयाचे निरीक्षण आहे. तो निवाडा नव्हे. हिंदुत्वाचे आवाहन करून ज्यांनी मते मागितली त्यांपैकी तिघांची निवड न्यायालयाने रद्द केली होती. काही जणांचा काही काळाकरिता मतदानाचा हक्कही काढून घेतला होता. तेव्हा न्यायालयाचा असा निकाल आहे हा गैरसमज आधी दूर केला पाहिजे.

*'हिंदुत्ववाद' व 'सेक्युलॅरिझम' परस्परविरोधी आहेत की सुसंगत?*

हिंदुत्वाचा तुम्ही कोणता अर्थ घेता यावर हे अवलंबून आहे. हिंदुत्व म्हणजे हिंदू धर्म असे म्हणणार असाल, तर तो अनेक बाबतींत परस्परविरोधी होईल. 'हिंदुत्व' म्हणजे 'रिलिजन' म्हणणार असाल तर कलम २५मधील अटींच्या अधीन राहून तो पाळला तर सुसंगत राहील. हिंदुत्व म्हणजे हिंदूंच्या न्याय्य व घटनात्मक हक्कांचे रक्षण असा सावरकरप्रणीत अर्थ घेतला तर तो सुसंगत राहील. हेच सर्व धर्मांना लागू आहे.

*'सेक्युलॅरिझम' आणि 'समान नागरी कायदा' यांचा काय संबंध आहे?*

समान नागरी कायदा म्हणजे सर्व धर्मीयांच्या इहलौकिक जीवनासाठी लागू असणारे समान कायदे. याचा पारलौकिक व आध्यात्मिक धर्माशी काही संबंध नसतो. घटनेनेच इहलौकिक जीवनासंबंधी कायदे करण्याचा राज्याला अधिकार दिलेला आहे व धर्माच्या आधारे भेदभाव करू नये, हेही तत्त्व स्वीकारले आहे. त्यामुळे असा समान नागरी कायदा करण्याचा राज्याला अधिकार आहे. घटनेत यासाठीचे कलम ४४ नसते तरीही असा कायदा करण्याचा राज्याला अधिकार आहे.

*मग सरकार 'समान नागरी कायदा' का करीत नाही?*

याचे कारण सर्वांनाच माहीत आहे. मुसलमानांचा अशा कायद्यास विरोध आहे. त्यांची वाटणारी भीती हे त्याचे उघड कारण आहे. तरीही उत्तराखंड राज्याने असा कायदा केला असून तो २६ जानेवारी २०२५पासून अमलात आला आहे. त्यावर ग्रंथात स्वतंत्र प्रकरण आहे. हळूहळू एक एक राज्य असा कायदा करीत जाईल व शेवटी सर्व भारतासाठी केंद्र शासनाचा तो कायदा राहील.

*सध्याच्या शासनाने वक्फ कायद्यात दुरुस्ती केली आहे, याबद्दल तुम्हाला काय वाटते?*

‘वक्फ’ म्हणजे मुसलमानांनी (किंवा पूर्वीच्या त्यांच्या राज्यकर्त्यांनी) त्यांच्या धर्मकार्यासाठी दान दिलेली मालमत्ता. ती स्थावर किंवा जंगम दोन्हीही असते. सध्या ‘वक्फ’च्या नावे असलेली जमीन सैन्य व रेल्वे यांच्याकडे असलेल्या जमिनीच्या नंतर तिसऱ्या क्रमांकाची आहे व ही अल्लाला दिलेली मालमत्ता असल्यामुळे तिचे हस्तांतर वगैरे होऊ शकत नाही. ‘वक्फ ही कायमची वक्फ असते’ असे हे तत्त्व आहे व सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी एका निवाड्यात हे मान्य केलेले आहे. ही माल मत्ता असल्यामुळे ती ‘सेक्युलर’ ठरते व म्हणून राज्याला तिच्यासंबंधी कायदे करण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे तिच्या व्यवस्थापनासाठी पूर्वीच कायदा करण्यात आला आहे. त्यानुसार तिचे व्यवस्थापन करण्याचा संपूर्ण अधिकार मुस्लीम समाजाकडे होता. त्या मालमत्तेचा उपयोग फक्त मुस्लीम समाजासाठी होऊ शकतो. सध्याच्या शासनाने यापूर्वीच्या कायद्यात दुरुस्ती करून त्या माल मत्तेच्या व्यवस्थापनाचे काही अधिकार स्वत:कडे घेतले. हिंदूंच्या देवस्थानांच्या मालमत्तेचे संपूर्ण अधिकार कायदे करून शासनाने स्वत:कडे घेतले आहेत; मात्र वक्फच्या मालमत्तेला सरकार हात लावण्यास तयार नाही. नव्या कायद्यात वक्फचे व्यवस्थापन करणाऱ्या त्यांच्या मंडळावर काही शासकीय अधिकारी असण्याची तरतूद केली आहे, यास मुसलमानांचा आक्षेप आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे वक्फच्या मालमत्तेचे व्यवस्थापन हा ‘सेक्युलर’ कृतीचा व समान नागरी कायद्याचा भाग आहे. पुढील काळात हा वाद खूप वाढत जाणार आहे. यासाठी आम्ही ग्रंथात सविस्तर एक प्रकरणच लिहिले आहे.

सावरकरांचे हिंदुत्व म्हणजे काय?
त्यांनी हिंदुराष्ट्राचा व तथाकथित द्विराष्ट्रवादाचा
पुरस्कार केला होता?
त्यांना अभिप्रेत असणाऱ्या राज्यघटनेचा
पाया कोणता होता -
धर्मग्रंथ की अद्ययावत बुद्धिप्रामाण्य?




सावरकरांचा बुद्धिवाद
आणि हिंदुत्ववाद
शेषराव मोरे

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

*‘स्यूडो सेक्युलर’ हा शब्दप्रयोग प्रचारात आला आहे. याबद्दल तुम्हाला काय वाटते?*

हा शब्दप्रयोग स्वत:ला ‘सेक्युलर’ म्हणवून घेणाऱ्यांकडून जो धार्मिक पक्षपात केला जातो, त्याबद्दल वापरला गेला व जात आहे. हे सेक्युलर पक्ष व विचारवंत कायदे करण्यापासून कोणत्याही प्रकरणी धार्मिक अल्पसंख्याकांची बाजू घेत असतात हे खरे आहे. त्यामुळे झाले हे की, ‘सेक्युलॅरिझम’ची संकल्पना सर्वधर्मीयांना समानतेने वागविण्याशी जोडली गेली आहे. वस्तुत: घटनेप्रमाणे ही संकल्पना इहलौकिक बाबींचे सर्वाधिकार राज्याकडेच व व्यक्तीचे धर्मस्वातंत्र्य फक्त पारलौकिक व आध्यात्मिक बाबींपुरते मर्यादित असेल, अशी आहे. ही भूमिका समाजात रुजविण्याची गरज आहे, ही भूमिका मांडण्यासाठी हे पुस्तक आम्ही लिहिले आहे व आम्हाला विश्वास आहे की, हे पुस्तक वाचकांना ‘घटनात्मक सेक्युलॅरिझम’कडे पाहण्याची दृष्टी देईल व त्याच्या अर्थाचा सावळा गोंधळ कमी होईल.

धन्यवाद.

❖


आपल्या अनवट लेखनशैलीसाठी मराठी वाचकांना परिचित असलेल्या,
तसेच लेखनहेतूच्या स्वच्छतेबद्दल सजग आणि संवेदनशील असलेल्या
साहित्यिक मेघना पेठे यांचे एक नवे पुस्तक
वाचकांच्या भेटीस आले आहे...




‘डंर्ट्, बींदेअर्’

हा आहे लेखिकेचा एक भावप्रवास...
स्वत:सोबतच साहित्यविषयक सखोल जाणिवेनं
विचार करणाऱ्या व्यक्तींसोबतचा...
आणि आहे मुक्त संवाद, चिंतनही!
तेव्हा जरूर संग्रही ठेवा...
‘डंर्ट्, बींदेअर्’

लेखक व प्रकाशक : मेघना पेठे

डंर्ट प्रकाशन

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

वितरक : राजहंस प्रकाशन, पुणे

अभिनंदन!

## मनोरमा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, सोलापूर



मनोरमा राज्यस्तरीय
साहित्य सेवा पुरस्कार

**आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग**

◆

डॉ. अपूर्वा जोशी




अभिनंदन!

## पद्मगंधा साहित्य प्रतिष्ठान, नागपूर राज्यस्तरीय पुरस्कार




स्व. विमलताई देशमुख
ललित लेखन पुरस्कार


**गोंदणखुणा**

◆

डॉ. प्रिया निघोजकर




---



स्व. शांताबाई शेकदार
बालसाहित्य पुरस्कार

**आबली**


◆

प्रमोद धायगुडे



अभिनंदन!

## अुत्कर्ष मंडळ, विलेपारले




आद्य सरसंघचालक
डॉ. हेडगेवार ग्रंथगौरव
पुरस्कार २०२५

**पाकिस्तान का**
**मतलब क्या?**

◆


श्रीधर लोणी





अभिनंदन!

## श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले), नगर वाचनालय, सातारा

कादंबरीकार ना. ह. आपटे
पुरस्कार








**सजीवांचा नामदाता**
**कार्ल लिनियस**

डॉ. उमेश
करंबेळकर

**ओळख**
**पक्षिशास्त्राची**

# सीता

*‘सीता’ ही वाङ्मय-कृती बुद्धिमती सीतेच्या अंतरंगाचे खोलवर अवगाहन करता-करता सद्य:स्थितीवरील अचूक आणि भेदक भाष्य करणारी, विद्यमान काळाबरोबरच आगामी भविष्यालाही सुजाण कर्तबगारीने सामोरे जाण्याचे सामर्थ्य प्रदान करणारी आणि भारतीय संस्कृतीच्या प्रगल्भतेचे विलोभनीय दर्शन घडविणारी आहे. या कादंबरीचे हे आस्वादन...*

हा आस्वादक वाचनाचा सहजपणे मनात उमटलेला एक प्रतिसाद आहे. संपूर्ण पुस्तकाचा समग्र विचार केला की जाणवते, हा एकट्या सीतेच्या व्यक्तिमत्त्वाचा वा मनाचा ठाव नाही, केवळ एका प्रज्ञावंत स्त्रीमनाचाही नाही, तर हा समग्र जीवनविषयक जिज्ञासेचा शोध आहे. युगानुयुगे ही जिज्ञासा अतृप्त आहे, तरीही हवीशी वाटणारी आहे. नियती की कर्म? हा सीतामाईच्या मनात वारंवार उमटणारा प्रश्न अनुत्तरित आहे, शाश्वत आहे. त्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणाऱ्या वाटचालीची दिशा कोणती?

एक दिशा आहे ती सीता, रामचंद्र, हनुमान आदींनी घेतलेली रामराज्याची. तर दुसरी आहे रावण, छद्ममूर्ती आणि विकटकीर्ती यांनी घेतलेली अभद्र जीवनशैलीकडे नेणारी...! एकमेकींशी आट्यापाट्या खेळत पुढे जाणाऱ्या या दिशांची मीमांसा वाचताना वाचक नकळत पण ठामपणे सद्य:स्थितीकडे वळतो आणि लक्षात येते सीतामाता- तिनेच प्रतिपादलेली रामराज्याची अमूर्त पण आदर्श संकल्पना ही जितकी वास्तव आणि शाश्वत आहे, तितकेच वास्तव (आणि चिरंतनही) आहेत छद्ममूर्ती आणि विकटकीर्ती.

एकूण रामायण हा एक भुलभुलैय्या आहे - आणि रामायणच काय, जीवन हाच एक भुलभुलैय्या आहे - तो प्रसंगी व्याकूळ करणारा, कधी हुरहुर लावणारा, कधी प्रचंड खंत वाटून निराश करणारा पण सदैव हवाहवासा वाटणारा भुलभुलैय्या..!

संवाद आणि त्यातून स्पष्ट होणाऱ्या व्यक्तिरेखा ही या पुस्तकाची मुख्य ताकद आहे असे वाटते. राजा दशरथ आणि विश्वामित्र यांच्यातील संवाद, जानकीचा जनकाशी - परशुरामांशी झालेल संवाद, मैत्रेयी आणि सीता यांचा संवाद, अहिल्या आणि सीता यांच्यातील संवाद, सीतेचा स्वत:शी संवाद...! अन् या सगळ्यांवर

बहुधा कळस चढवणारा ऋषी वाल्मिकींचा स्वत:शी होणारा संवाद! त्यातून व्यक्त होणारा ऋषिवर्यांच्या मनातला संभ्रम खूपच मनोज्ञ वाटतो. त्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर नारदमुनींनी वाल्याच्या अवतारातील वाल्मिकीला उद्देशून केलेले, 'माणसानं आयुष्यभर निरुत्तर राहिलं तरी चालेल पण निष्प्रश्न राहू नये... अनिश्चिततेत एक गंमत आहे, कदाचित या अनिश्चिततेमुळेच माणसाच्या जीवनालाही प्रयोजन लाभलं असावं...!' हे भाष्य एकाच वेळेला अजबही वाटले तर त्याच वेळी आश्वासकही वाटते. याच (नारदमुनींच्या) भाष्याची समांतर मीमांसा सीता-अनसूया यांच्या संवादातही प्रत्ययाला येते. ''जानकी, प्रारब्ध आणि कर्म समांतर वाटचाल करीत राहते. संचित कर्मं, मागील जन्माची कर्मं प्रारब्धरूपाने सामोरी येतात, त्याच वेळी क्रियमाण कर्मांनं आपण पुढल्या संचिताचा घट भरत असतो. म्हणूनच एकाच वेळी निषिद्ध कर्म टाकून संचिताचा घट भरणार नाही असं बघावं. आणि मागलं सर्व आनंदानं भोगून मोकळं व्हावं. असं का, याचं उत्तर मानवाला तर्कानं देता येत नाही, म्हणून त्या उत्तराच्या मागे लागून कालापव्यय करू नये. मानवाचा तर्क एका ठिकाणी जाऊन थांबणार आहे. ज्यापलीकडे बरंच काही आहे.'' (अनसूया)

या संवादांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सहज जाता जाता काही वाक्यांमधून अत्यंत महत्त्वाचा, मोलाचा संदेशही अधोरेखित होऊन जातो. उदाहरण पहा : नारदमुनी वाल्मिकींना, ''नमस्कार नको, नमस्कार घेण्याची सवय पुढे हव्यासात बदलून जाते आणि तो पाश तोडणं महाकठीण.'' राम-लक्ष्मण-सीता यांचा निरोप घेताना परशुरामाने उच्चारलेले वाक्य - ''विवेकाचं महत्त्व कोण नाकारेल? पण विवेक डोळस हवा आणि त्याला बळाची जोड हवी..!''

कैकेयीच्या तोंडचे एक वाक्य मात्र अंतर्मुख करणारेच नव्हे, तर दाहकही आहे. 'रघुकुलात बुद्धिवंत आणि प्रज्ञावंत स्त्रीलाच खूप काही सोसावं लागतं.' या विधानाने कोणीही चमकेल हे खरेच. (स्वत: सीताही चमकली असाच उल्लेख आहे.) पण त्यामुळे कैकेयीला केवळ खलनायिका समजण्याच्या विचारासमोर प्रश्नचिन्हही उमटते.

एकूणच या पुस्तकाच्या संहितेमध्ये रामापासून रावणापर्यंत आणि बिभीषणापासून अगदी शूर्पणखेपर्यंत सर्वच शक्तींना एक समतोल विचारांचा न्याय दिलेला आढळतो, प्रत्येक व्यक्तिमत्त्वाची भूमिका सरधोपट विचारापासून दूर होऊन अलिप्तपणे विचारात घेण्यास वाचक प्रवृत्त होतो. खरे तर अगदी श्रद्धावान वाचकाच्या मनातही, विशेषत: सीतेविषयीच्या रामाच्या भूमिकेबाबत वेदनादायक प्रश्न उमटत असतात. केवळ एका नागरिकाने आक्षेपकारक उल्लेख केल्याचे कानावर आल्याने रामाने तिला गर्भवती अवस्थेत पुन्हा वनात पाठवावे याचे औचित्य सहजी गळी उतरत नाही.

पती-राम आणि राजा-राम यांच्या भूमिकांमधील द्वंद्वाचा तो परिणाम होता. (पूर्व पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या एका अजरामर भाषणात हेच स्पष्टीकरण दिलेले आठवते.) हे स्पष्टीकरणही पुरेसे समाधान करीत नाही. मात्र या कादंबरीत


त्याबाबतचे केलेले विवेचन अद्भुत आहे. आपल्या कल्पनेतले आदर्श रामराज्य स्थिर करायचे आहे, भ्रामक, कुटील आणि छद्म विमर्शाला परास्त करायचे आहे आणि 'राम' तत्त्वाची संकल्पना निष्कलंक राखायची तर त्याग अपरिहार्य आहे, नव्हे तोच एक प्रभावी मार्ग आहे याची जाणीव ती जागवते हे प्रतिपादन खरोखरच अद्भुत आहे. पूर्ण समाधान करणारे आहे की नाही हे नाही सांगता येत, पण सीतेची आणि रामाचीही महत्ता कित्येक पटींनी वाढवून नतमस्तक व्हायला भाग पाडणारे आहे हे नक्की. वास्तवाची जाणीव करून देणारी सदैव सावध सीता लक्ष्मणाला जे सांगते ते या संदर्भात महत्त्वाचे आहे. ''हेच तर दुःख आहे, लक्ष्मणा. दुष्टांना दुष्टपणाचा ना कंटाळा येतो, ना घृणा. मात्र चांगल्याला चांगुलपणाचं ओझं होतं...!'' वाल्मिकी ऋषींच्या नकळत लिहिल्या जाणाऱ्या उत्तरकांडाचा आरंभ आणि निष्कर्षही सीतेच्या मुखातून जणू व्यक्त झाला आहे.

हे उत्तरकांड आणि विशेषत: त्यातील वैचारिक संभ्रमाचा विमर्श निर्माण करण्याचे उपद्रवी उद्योग आजही सुरू आहेतच. विघ्नसंतोष, विघटन, विद्वेष यांची पेरणी करून समाजजीवनाची निरामयता कलंकित करणारे छद्ममूर्ती, विकटकीर्ती आजही समाजात वावरताना दिसतात. 'सीता'चे लेखक अतिशय चपखलपणे या वास्तवाचे सूचन करीत राहतात. कुकर्मी आक्रमकतेला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याची लाचार उठाठेव, उन्मत्त रावणाच्या एकाधिकारशाहीला बळ देणारी बुद्धिवंतांची यंत्रणा, धर्माची निर्भर्त्सना आणि अराजकालाच सुशासनाचे गोंडस लेबल चढविणारी यंत्रणा या साऱ्याची मीमांसा आजच्या परिभाषेतील विकृत विमर्शनिर्मितीचा (Narrative building) स्पष्ट प्रत्यय घडविणारी आहे. अन् त्याचबरोबर लोकमानस - जनमानस प्रभावित करण्याच्या धडपडीचे दिग्दर्शन करणारी आहे. आज अशाच धडपडीचे उपद्व्याप आपणास अनुभवाला येताहेत ना?


तबल सहा दशकांचा काळ मराठी मनाला
मनसोक्त रिझवणारा... हा अष्टपैलू प्रतिभावान
असंख्य मराठी मनांचा एक कप्पा कायमचा व्यापून
बसला आहे! पुलंना शोभेशा शैलीत घेतलेला वेध
पुलंच्या जीवनाचा, त्यांच्या काळाचा,
काळावर त्यांनी उमटवलेल्या अमीट नाममुद्रेचा!

पु.ल. : चांदणे स्मरणाचे

मंगला गोडबोले





आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)

याआधी ज्येष्ठ लेखक भैरप्पा यांचे ‘उत्तरकांड’ वाचले होते. हे खरेच आहे की त्यातून भैरप्पांनी मांडलेल्या सीतेच्या व्यक्तिरेखेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि ‘सीता’ या साहित्यकृतीने अंगीकारलेला दृष्टिकोन यांत मूलभूत फरकाचा आभास आहे. त्या- उत्तरकांड-मधून व्यक्त होणारी बिभीषण, लक्ष्मण यांची प्रतिक्रिया खिन्नतेची आणि प्रसंगी रामाच्या दृष्टिकोनाला अतर्क्य ठरविणाऱ्या विस्मयाची आहे. तर ‘सीता’मधील सीतेची भूमिका बिभीषण, लक्ष्मण इतकेच काय तर खुद्द रामचंद्र, वीरदास यांनाही विस्मयचकित करणारी आहे. तरीही मनात येऊन जाते की, ‘सीता’ हे तिचे रूप भैरप्पांनी मांडलेल्या स्वरूपाचा विस्तार करणारे आहे. भैरप्पा यांची सीता ही रामाच्या रूपाने सुजाण समाजमनाला प्रश्न विचारणारी-अगदी जाब विचारणारी आहे. तर भडकमकरांची सीता समाजमनाचा परिष्कार करणारी, रामराज्य संकल्पनेलाही परिष्कृत करणारी आणि समाजमनासमोर चिरंतन प्रश्नांच्या उत्तराकडे प्रस्थान करण्याचे आवाहन करणारी आहे.

एकूणच ‘सीता’ ही वाङ्मय-कृती बुद्धिमती सीतेच्या अंतरंगाचं खोलवर अवगाहन करता करता सद्य:स्थितीवरील अचूक आणि भेदक भाष्य करणारी, विद्यमान काळाबरोबरच आगामी भविष्यालाही सुजाण कर्तबगारीने सामोरे जाण्याचे सामर्थ्य प्रदान करणारी आणि भारतीय संस्कृतीच्या प्रगल्भतेचे विलोभनीय दर्शन घडविणारी आहे. खरेच, रामायण आणि तत्सम ‘महावाङ्मयाने’ मानवतेप्रति केवढे मोठे ऋण निर्माण करून ठेवले आहे. भारतीय प्राचीन संस्कृती हे साफल्य, सार्थकता, समाधान, समृद्धी, सृष्टिसौख्य आणि प्रगल्भता नसानसांत भरलेले एक वरदान आहे. या वरदानाचा प्रत्ययकारी साक्षात्कार घडविणाऱ्या या पुस्तकाच्या लेखनाबद्दल, मित्रा, अभिरामा, तुला लाख लाख धन्यवाद.

शुभं भवतु. लोका: समस्ता सुखिनो भवन्तु.

***अरुण करमरकर***, ठाणे
९३२१२५९९४९




कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

सीता

अभिराम भडकमकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा


आजच्या सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थितीशी नानाविध ज्ञानशाखांच्या एकात्मिक अभ्यासाचा संबंध जोडत माणसाच्या व्यक्तिगत अन् सामूहिक वर्तनाचा वैज्ञानिक वेध घेणारे...

### माणूस 'असा' का वागतो?

अंजली चिपलकट्टी

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)




हे पुस्तक केवळ डॉ. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र नसून स्वतंत्र भारताच्या तंत्रज्ञानविषयक लढाईचे एक स्पंदन आहे. जागतिक शस्त्रस्पर्धेच्या राजकारणाची आणि विज्ञानाची ती कहाणी आहे; तसेच स्वयंपूर्ण होण्यासाठी आपल्या देशाने केलेल्या संघर्षाचे ते मनोहारी खंडकाव्यही आहे.

### अग्निपंख (आत्मचरित्र)

ए पी जे अब्दुल कलाम

सहायक : अरुण तिवारी । अनु. : माधुरी शानभाग

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

'महाभारत' हे केवळ महाकाव्य नाही. यात जीवनाच्या कायदेकानूनांची संहिता, सामाजिक-नैतिक संबंधांचे तत्त्वज्ञान आणि ज्यांना भिडणे कठीण अशा मानवी समस्यांचे चिंतन आहे.

### कथारूप महाभारत : खंड १ व २


कमला सुब्रह्मण्यम

अनु. : मंगेश पाडगांवकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा



सामान्य माणसाची प्रयोगशाळा आहे ‘कट्टा’.
प्रत्येकाला सर्वकाळ आणि सर्वत्र उपलब्ध असलेली.
अशा ‘कट्टा’ प्रयोगशाळेतून विज्ञानक्षेत्र
अधिक निकोप आणि लोकाभिमुख करणारे -

### कट्टा मॉडेल

डॉ. मिलिंद वाटवे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)


ज्ञानग्रहण आणि ज्ञानसंवर्धन मुक्तपणे होऊ शकेल,
हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न म्हणजे
‘ओपन सोर्स’ चळवळ! वेगाने विस्तारणाऱ्या
या लोकचळवळीच्या
विविध पैलूंचा परामर्श घेणारी मनोज्ञ सफर!

### महाजालाचे मुक्तायन

अमृतांशु नेरुरकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)





‘साहित्य अकादमी युवा पुरस्कार’ विजेता
काव्यसंग्रह! समकालीन वास्तवात सामाजिक,
राजकीय आणि सांस्कृतिक अंगाला
भिडणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांच्या
कविता!

### मी संदर्भ पोखरतोय

पवन नालट

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# आम्हां असे अभिमान

साहित्यक्षेत्रातील सन्मानाच्या ‘साहित्य अकादमी पुरस्कार’प्राप्त ‘राजहंसी’ साहित्यकृतींचा जागर...

*सन २०२१मध्ये ‘ब्राह्मोस : अज्ञात संशोधनयात्रेची यशोगाथा’ (मूळ लेखक : ए शिवतनू पिल्लई) हे अभय सदावर्ते यांनी अनुवादित केलेले पुस्तक ‘राजहंस’ने प्रकाशित केले. या पुस्तकास सन २०२३मध्ये ‘साहित्य अकादमी पुरस्कार’ प्राप्त झाला. प्रस्तुत पुस्तकातील ‘क्षितिजाच्या पलीकडे - उद्याचे चित्र’ या भागातील हा संपादित अंश...*

## ब्राह्मोस

*ब्राह्मोस हे आपल्या लक्ष्यावर अचूक आघात करणारे, ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने जाणारे जगातले सर्वांत वेगवान क्रूझ क्षेपणास्त्र आहे. या क्षेपणास्त्राच्या विकास आणि निर्मितीचा भारत आणि रशिया यांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारलेला हा महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. अज्ञात वाटेवरील संशोधनाचे हे साहस म्हणजे ‘आपण हे करू शकतो’ असा आत्मविश्वास जागवणारा पहिलावहिला अनुभव! मर्यादित गुंतवणूक, व्यावसायिक व्यवस्थापन, गतिशील निर्णयप्रक्रिया, अनोखी कार्यपद्धती आणि पारदर्शी प्रामाणिकता यांच्या संयोगातून वास्तवात उतरलेले हे स्वप्न आहे. या प्रकल्पातून जन्मलेले यशस्वी प्रारूप आत्मनिर्भर राष्ट्रनिर्मितीसाठी अन्य क्षेत्रांमध्येही उपयोगांत आणता येईल. या प्रकल्पाची त्याच्या निर्माणकर्त्यांने सांगितलेली प्रेरक जन्मकथा म्हणजे हे पुस्तक आहे. भारताच्या संरक्षण-सामर्थ्याच्या दृष्टीने ब्राह्मोसचे सामरिक महत्त्व आहे. अभय सदावर्ते यांनी हा तांत्रिक व वैज्ञानिक विषय सोप्या, प्रवाही भाषेत मांडला आहे.*

**स्वनातीत वेगाच्या पलीकडे**

‘ज्या समाजात भविष्यवेधी दृष्टीचा अभाव असतो, त्या समाजाचा नाश होतो.’ या अर्थाची एक म्हण बायबलमध्ये (२९:१८) आढळते. जिला दीर्घकाल काम करण्याची इच्छा आहे, त्या कुठल्याही संघटनेनेदेखील हेच तत्त्व नित्य ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. आपली संघटना ही सदैव प्रगतिपथावर राहावी, यासाठी संघटनेची पायाभरणी ही टिकाऊ आणि नित्य उत्क्रांत होत जाणाऱ्या तत्त्वांच्या आधारे करणे गरजेचे असते.

पुढेपुढे जाणाऱ्या काळाच्या संगतीने आपली कामगिरी सतत उंचावत नेणे, नवनवीन आणि उत्तरोत्तर अधिकाधिक कार्यक्षम होत जाणाऱ्या उत्पादनांची निर्मिती करणे, ती उत्पादने आपल्या ग्राहकाला विश्वासार्ह वाटतील, तसेच ती त्याला परवडण्याजोगीही असतील आणि या उत्पादनांचे आयुष्यदेखील दीर्घ असेल, यावर लक्ष ठेवणे; या आणि यासारख्या घटकांवर कुणाही उत्पादकाचे वा संघटनेचे दीर्घायुष्य अवलंबून असते. आधीच्या उत्पादनांना वा सेवांना जर नवनवीन उत्पादनांची आणि सेवांची वेळोवेळी जोड मिळत राहिली, तर संघटनेचे सामर्थ्य आपोआपच वाढत जाते.

ब्राह्मोसमध्ये काम करणारे तरुण आणि तडफदार अभियंते त्याचप्रमाणे विविध क्षेत्रांतले तज्ज्ञ आणि बुद्धिमंत यांच्या एका गटाने ब्राह्मोस-भविष्यवेध २०५० या शीर्षकाचा एक आराखडा (ब्राह्मोसचा भविष्यवेध - २०५०) तयार केला आहे. या दस्तऐवजाचे एकूण दोन भाग आहेत. पहिल्या भागात आज अस्तित्वात असलेली ब्राह्मोस ही क्षेपणास्त्रप्रणाली आणि नजीकच्या भविष्यात या क्षेपणास्त्राला कराव्या लागणाऱ्या नवनव्या भूमिका यांचा समावेश आहे, तर दुसऱ्या भागात ब्राह्मोस-दोन संबंधीचे विवेचन आहे.

## अवकाशातील सौर ऊर्जा

भूगर्भात असणारे ऊर्जानिर्मितीचे स्रोत (खनिज तेल आणि नैसर्गिक वायू इत्यादी) आता वेगाने आटत चालले आहेत, तर ज्या ऊर्जास्रोतांचे नूतनीकरण होऊ शकते (रिन्युएबल एनर्जी), असे सौरेतर स्रोत (वारा, जैविक पदार्थ म्हणजे बायोमास आणि सागराच्या लाटा वा पाणी) या स्रोतांची उपलब्धताही मर्यादित आहे. (अंदाजे १०० गिगावॅट) हे लक्षात घेता भारताने राष्ट्रीय सौरऊर्जा मोहीम हाती घेतली असून त्यामध्ये जमिनीवरील सौरऊर्जा निर्मितीची केंद्रे निर्माण करण्यावर आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. २०२०पर्यंत २० गिगावॅट, २०३०पर्यंत १०० गिगावॅट आणि २०५०पर्यंत २०० गिगावॅट सौरऊर्जा निर्मितीची लक्ष्ये या मोहिमेअंतर्गत निश्चित केली गेली आहेत. ही ऊर्जा जमिनीवरील ऊर्जानिर्मिती केंद्रांच्या मदतीने निर्माण केली जाईल.

अवकाशात असणारी उदंड सौरऊर्जा हा आपल्या ऊर्जेच्या गरजेसाठीचा अखंड, कधीही उपलब्ध असणारा आणि स्वच्छ स्रोत आहे, हे आता माणसाच्या लक्षात आले आहे. अन्य ऊर्जानिर्मितीच्या उपायांना हा एक समर्थ पर्यायही आहे, हेही माणसाने ओळखले आहे. मात्र अवकाशातील सौरऊर्जा निर्मितीच्या केंद्राची उभारणी करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान हे विलक्षण गुंतागुंतीचे तर आहेच, शिवाय या प्रकल्पातील तंत्रशास्त्रदृष्ट्या आणि प्रशासकीयदृष्ट्या आव्हानेही अनोखी आहेत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकार्य गरजेचे आहे. हे सगळे ध्यानात घेता

आजपासून १० ते १५ वर्षांनी या दृष्टीने काही सर्वंकष आणि दृश्य प्रयोग करता येणे शक्य होईल, असे वाटते.

आज विकसित केले गेलेले प्रगत भौतिक पदार्थ आणि तंत्रशास्त्रातील प्रगतीचा वेग, हे सगळे पाहता अंतराळातील ऊर्जा हा व्यापारी दृष्टिकोनातूनही एक आकर्षक प्रयोग ठरेल, नव्हे, त्यातली व्यापारी आकर्षकता वाढतच जाईल असेही वाटते. सौरऊर्जेवर चालणाऱ्या विद्युत्घटांची (सोलर सेल) कार्यक्षमता विलक्षण रीतीने वाढवण्यात आपण यशस्वी ठरलो आहोतच, पण त्याचबरोबर त्यांचे वजन आणि त्यांची किंमतदेखील आपण बरीच कमी करू शकलो आहोत. २०२०पर्यंत नॅनो तंत्रज्ञानाचा उपयोग करून घडवलेले आणि सौरऊर्जेवर चालणारे विद्युत्घट पारंपरिक ऊर्जास्रोतांसमोर (भूगर्भातील स्रोत) स्पर्धक म्हणून उभे राहतील, असे वाटते; कारण तोपर्यंत या विद्युत्घटांचे व्यापारी तत्त्वावर उत्पादन सुरू होण्याची शक्यता आहे. सूर्यप्रकाशाच्या मदतीने जी सौरऊर्जानिर्मितीची जमिनीवरील केंद्रे आहेत, ती दिवसाला केवळ ६ ते ८ तासच काम करू शकतात. ही उणीव लक्षात घेता आज नाही, तरी उद्या अंतराळातील सौरऊर्जा आपल्याला गरजेची ठरेल, हे निश्चित होय!

१९९३मध्येच अवकाशातील सौरऊर्जेची आणि तिच्या निर्मितिकेंद्रांची गरज भारताच्या ध्यानात आली होती. एकविसाव्या शतकात ऊर्जेची मागणी ही नित्य वाढती राहील; ऊर्जेसंबंधीचा एखादा जागतिक पेचप्रसंगही एकविसाव्या शतकात उभा राहू शकेल, हे सांगायला कुणा ज्योतिषाची आवश्यकता नाही. आणि म्हणूनच अवकाशातील वाहतुकीसाठी उपयोगी ठरणाऱ्या प्रगत तांत्रिक प्रणालीची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी तिचा आराखडा तयार करणे आणि परवडण्याजोग्या किमतीत ती ग्राहकाला उपलब्ध करून देणे तसेच अवकाशात सौरऊर्जानिर्मितीचे केंद्र उभारणे यावर काम सुरू आहे.

❖


आपल्या लक्ष्यावर अचूक आघात करणारे, ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणारे जगातले सर्वांत वेगवान क्रूझ क्षेपणास्त्र – ब्राह्मोस.
त्याच्या निर्माणकर्त्याने सांगितलेली जन्मकथा.

ब्राह्मोस

ए. शिवतनु पिल्लई । अनुवाद : अभय सदावर्ते
प्रस्तावना : ए. पी. जे. अब्दुल कलाम

किंमत : ₹ ३७५/- । (ट.ख. ₹ ५०)




। हार्दिक अभिनंदन ।

सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)तर्फे
**अरुण खोपकर** यांना
दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार - २०२५

अरुण खोपकर यांची 'राजहंसी' ग्रंथसंपदा



**गुरुदत्त**




**चित्रव्यूह**



**चलत्-चित्रव्यूह**




**प्राक्-सिनेमा**

---


सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)तर्फे
**विनय नारकर** लिखित

**वस्त्रगाथा**



या ग्रंथास

**वैचारिक ग्रंथ पुरस्कार २०२५**




# असे जन्मले पुस्तक

## हरित हिंदुत्व

गेली सुमारे ४५ वर्षं ‘धारणाक्षम विकास’, आणि त्याच्याही पुढे जाऊन ‘सम्यक् विकास’ हे माझ्या आस्थेचे, चिंतनाचे, लेखन-व्याख्यानादी प्रबोधन-कार्याचे, आणि मुख्य म्हणजे जगण्याचेही विषय होऊन राहिलेले आहेत. ह्या संपूर्ण काळात, आज ज्याला ‘विकास’ म्हटलं जातं तो ‘सम्यक्’ किंवा ‘धारणाक्षम’ तर नाहीच; उलट, ती सर्वांगीण विनाशाचीच प्रक्रिया आहे, हे मला अधिकाधिक निश्चितपणे उमगत गेलं. ‘राजहंस’नंच प्रकाशित केलेल्या माझ्या ह्यापूर्वीच्या विविध पुस्तकांतून मी ह्याची सविस्तर मांडणी, ऊहापोह केलेला आहेच. व्यक्ती, परिवार, समाज, राष्ट्र आणि पर्यावरण ह्या सर्व स्तरांवर हा विनाश चालू आहे. ह्या ‘विकासा’ची व्याख्याच मुळात ‘बृहद् आर्थिक वाढ’ अशी चुकीची, घातक केली गेल्यानं, त्यासाठी उपभोग आणि उत्पादन ह्यांत सातत्यानं वाढ अपेक्षित आहे. ही वाढच आतून व्यक्तींना; आणि बाहेरून परिवार, समाज, राष्ट्र आणि निसर्ग ह्या व्यवस्थांना संपवत आहे.

ह्या पार्श्वभूमीवर मला असा एक प्रश्न प्रथमपासून सतत पडत असे की, भारताचा सहस्रों वर्षांचा इतिहास हा—मधल्या काही शतकांचा तमोयुगाचा कालावधी सोडल्यास— एका संपन्न, वैभवशाली अशा राष्ट्राचा इतिहास आहे. भौतिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत भारतानं केलेल्या प्रगतीचे प्रत्यक्ष पुरावे अगदी आजही उपलब्ध आहेत–उभे आहेत. मग, तरीही, ‘ह्या प्रगतीमुळे निसर्गाची अपरिमेय हानी होऊन सारी व्यवस्थाच कोसळली’ असं का झालं नाही? त्या विकासाला सहस्रों वर्षांची धारणाक्षमता कशामुळे प्राप्त झाली? परकीयांची आक्रमणं होण्याआधी, किंवा झाल्यानंतरही, हा देश हिंदूंचा होता. अगदी आजही तो हिंदूबहुल आहे. मग, विकासाच्या ह्या धारणाक्षमतेला हिंदूंचं तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी, जीवनध्येय, जीवनशैली, त्यातून घडलेल्या शतकानुशतकांच्या प्रथा-परंपरा... हे तर साहाय्यभूत नसेल?





मी मुळातला अभियांत्रिकीचा विद्यार्थी;

पण, ह्या प्रश्नांची उत्तरं शोधताना मी तरुण वयातच हिंदू तत्त्वज्ञानाकडे वळलो. अनौपचारिकपणे त्याचा अभ्यास करत राहिलो. उपनिषदं, भगवद्गीता, पातंजल योग ह्यांचा अभ्यास केला. त्या जोडीला विवेकानंद, टिळक, राधाकृष्णन्, विनोबा, सावरकर, सातवळेकर, साने गुरुजी अशा—विविधरंगी!—चिंतकांनी हिंदू धर्माच्या वैशिष्ट्यांबद्दल काय सांगितलंय ह्याचाही धांडोळा घेतला. अनेक प्रत्यक्ष गुरूंचं, आणि देशोदेशींच्या ग्रंथगुरूंचं मार्गदर्शन मला चार दशकं मिळत राहिलं.

ह्या अभ्यासातून 'खरा विकास' म्हणजे काय हे मला समजलं. निव्वळ 'आर्थिक वाढी'ला विकास म्हणण्यातली चूक, घातकता आणि लबाडी हे तिन्ही लक्षात आलं. सर्व मानवांच्या संपूर्ण जीवनाला सुयोग्य प्रकारे आकारित करणारं हिंदू तत्त्वज्ञान, नि त्यावर आधारलेली चारही पुरुषार्थांचा समतोल साधणारी हिंदू जीवनशैली हीच व्यक्तीला एकीकडे खऱ्याखुऱ्या विकासाकडे नेते, नि दुसरीकडे सर्व स्तरांवरची 'धारणा'ही सुनिश्चित करते हे मला उमगलं. संयमित उपभोगांच्या जीवनशैलीतून अभ्युदय आणि निःश्रेयस ह्या दोन्हींची प्राप्ती करून घेण्याच्या सांगाव्यातलं मर्म उकललं.

* * *

ह्या विविध स्तरांवरच्या धारणेचा एक महत्त्वाचा आयाम म्हणजे निसर्गव्यवस्थेची धारणा. सामान्यत: १९८०नंतरचा काळ हा भारतातली पर्यावरणविषयक जाणीव वाढत जाण्याचा काळ होता. पर्यावरणाच्या समस्या वाढत होत्या, नि त्यांवर अनेक जण अनेक उपाय सुचवत होते. मला असं वाटलं की, हे उपाय फार वरवरचे आहेत. त्यांतून समस्यांचं फक्त 'स्थानान्तर' वा 'कालान्तर' होईल. त्या 'सुटायला' हव्या असतील, तर विकासामागचा मूळ विचार, मूळ तत्त्वज्ञानच वेगळं हवं. हिंदू तत्त्वज्ञान हे नेमकं असं तत्त्वज्ञान आहे असं जाणवून, १९८६मधल्या



आध्यात्मिक जीवनदृष्टी आणि त्यातून घडणारी संयमित
उपभोगाची जीवनशैली ही हिंदुत्वाची दोन मूलभूत वैशिष्ट्यं.
तसं जगणं हे खऱ्या अर्थानं 'धर्मपालन'!
निसर्गरक्षणासाठी उपयोगी ठरणाऱ्या मूळ
हिंदुत्वाची युगानुकूल मांडणी करणारं आणि त्याच्या
आचरणाचा आग्रह धरणारं हे पुस्तक -

## हरित हिंदुत्व

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

माझ्या पर्यावरणविषयक पहिल्या पुस्तकात—‘निसर्गायणा’मध्ये, ‘आनंदमीमांसा’ ह्या प्रकरणात—मी समकालीन परिप्रेक्ष्यात त्याची मांडणी केली आहे.

मग मी ह्या तऱ्हेची मांडणी सातत्यानं करतच राहिलो. पुण्याच्या ‘वेद विज्ञान मंडळा’च्या १९९४च्या वार्षिक परिषदेत मी ‘पातंजल योग आणि पर्यावरण’ हा निबंध वाचला. १९९५मध्ये मुंबईच्या ‘सोमय्या ट्रस्ट’नं आयोजिलेल्या परिषदेत मी ‘Green Manifestation of Saffron Culture’ हा निबंध सादर केला. १९९६मध्ये, मुंबईच्या ‘रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी’नं पहिल्या ‘डॉ. सालीम अली स्मृती व्याख्याना’त हा विषय मांडण्यासाठी मला आमंत्रित केलं. त्या व्याख्यानाची ‘Saffron Thinking - Green Living’ ही पुस्तिकाही त्यांनी प्रकाशित केली. ही पुस्तिका—कशी कुणास ठाऊक—केरळातल्या ‘केरळ कौंसिल ऑफ चर्चेस’ ह्या संस्थेपर्यंत पोहोचली, नि तिनं ‘पर्यावरणीय हिंदुत्वा’ची मांडणी करण्यासाठी सप्टेंबर २००१मध्ये मला व्याख्यानासाठी निमंत्रण दिलं! २००१मध्येच मी माझं ‘गतिमान संतुलन’ हे मासिक सुरू केलं. त्यात मी निमित्तानिमित्तानं अनेक वेळा हिंदूंच्या आजच्या निसर्गविरोधी वागण्यावर टीका करणारे; तसंच, योग्य आचरण कसं असलं पाहिजे हे सांगणारे लेख लिहिले. त्याच अंकांमध्ये मी ‘पातंजल योग आणि पर्यावरण’ आणि ‘भगवद्‌गीता आणि पर्यावरण’ ह्या सविस्तर लेखमालाही लिहिल्या.

तथापि, हे सारं तुकड्या-तुकड्यांत झालं : विषयाची सलग, सर्वांगीण मांडणी झाली नाही. ती करण्याची गरज खूप वर्षं जाणवत होती. इच्छाही होती. अखेरीस, प्रस्तुत पुस्तकाच्या रूपानं ती पूर्ण झाली.

* * *


आज ज्या पर्यावरणाच्या समस्या आपल्याला भेडसावत आहेत, त्यांमागे

अनेक प्रकारे उपयुक्त ठरणारी वीज
सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यात खेळवणाऱ्या -
आपले अवघे आयुष्य विद्युत्‌विज्ञानात
झोकून देणाऱ्या - मनस्वी वैज्ञानिकाच्या
विलक्षण आयुष्याचा वेध!

निकोला टेस्ला
रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक

सुधीर फाकटकर

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)



'वाढते उपभोग' हे मूळ कारण आहे. जगातील विविध धर्मांनी 'संयमा'चा संदेश देत लोकांच्या उपभोगप्रवणतेवर बंधनं घातलेली होती. 'विज्ञान' ह्या विचारसरणीनं ही बंधनं दूर केली, नि तेव्हापासून अतिरेकी उपभोग आणि अतिरेकी उत्पादन सुरू होऊन निसर्गाच्या हानीला प्रारंभ झाला. पुस्तकाच्या पहिल्या विभागात, विज्ञान आणि त्या साच्यात स्वत:ला बसवू पाहणारं अर्थशास्त्र ह्यांच्यामुळे निसर्गाची अत्यधिक हानी कशी होत आहे, हे मी उलगडून दाखवलं आहे. हिंदुत्वानं ह्या मूळ कारणावर नेमकेपणानं बोट ठेवून, असे अतिरेकी उपभोग टाळण्यासाठी जे आध्यात्मिक स्वरूपाचं तत्त्वज्ञान आणि जीवनदृष्टी आवश्यक होती ती कशी दिली, हे दुसऱ्या विभागात मी सांगितलेलं आहे; तर तिसऱ्यात, ह्या दृष्टीनं उपयोगी अशा विविध संकल्पना आणि प्रतीकं ह्यांची माहिती आहे.

असं हे हिंदुत्व हे प्राचीन असलं, तरी 'धारणाक्षमते'चे जे आधुनिक वैज्ञानिक निकष आहेत त्यांवरही ते पुरेपूर कसं उतरतं, हे RETPoWB Criteriaच्या आधारे चौथ्या विभागात मी दाखवून दिलेलं आहे. पाचव्या विभागात हिंदुत्वाच्या विविध हरित धोरणांचा ऊहापोह आहे.

ही सारी मांडणी ही आदर्श अशा हिंदुत्वाची आहे. महत्त्वाचा प्रश्न हा की, आजचं हिंदुत्व हे असं आहे का? 'हिंदुत्वा'च्या दोन कसोट्या म्हणजे 'आध्यात्मिक जीवनदृष्टी' आणि 'संयमित उपभोगाची जीवनशैली'. ह्या दोन्ही कसोट्यांना आजचं हिंदुत्व जराही उतरत नाही, हे मला स्पष्टपणे सांगावंसं वाटतं. ' 'होय, हिंदूच'!— खरंच?' ह्या प्रकरणात मी ह्याची परखड मांडणी केलेली आहे, आणि शेवटच्या प्रकरणात उद्याचं हिंदुत्व कसं असायला हवं हे सांगितलेलं आहे.

* * *

ह्या पुस्तकातलं 'हिंदुत्व' हे सामान्यत: ज्याला हिंदुत्व समजलं, म्हटलं जातं ते आहे. हिंदुत्वात तत्त्वज्ञान, विविध विचारधारा, संकल्पना, प्रथा-परंपरा, उपासनापद्धती, वर्तनरीत, जीवनशैली, सभ्यता आणि संस्कृती ह्यांचे विविध आयाम... अशा अनेक बाबींचा समावेश होतो. ह्या साऱ्यांच्या अंतर्गत असणाऱ्या स्वाभाविक भेदांना सहिष्णुतेतून, स्वीकारातून, समन्वयातून सामावून घेणारं हिंदुत्व हे 'हरित' कसं आहे, हे मला सांगायचं होतं; नि त्या हरितत्वाच्या पुन:स्वीकाराची निकडीची गरज अधोरेखित करायची होती.

* * *


शुद्ध हिंदुत्व-विचार हा संप्रदायातीत असा विचार आहे. जीवनाचं ध्येय आध्यात्मिक (पारलौकिक); पण, म्हणून ऐहिक (भौतिक) जीवनाची उपेक्षा मात्र नाही; तथापि, त्या रसरशीत, समृद्ध भौतिक जीवनाला आंतरिक आणि बाह्य निसर्गाच्या मर्यादेचं बंधन घातलेलं. त्यातून, एकीकडे, व्यक्तीची आध्यात्मिक ध्येयाकडची वाटचाल; नि दुसरीकडे, ऐहिक व्यवस्थांची सहस्रों वर्षांसाठीची धारणा

(sustainability) सुनिश्चित केलेली, असा अभ्युदय आणि नि:श्रेयस ह्यांचा सुंदर समन्वय साधणारा हा विचार आहे. ('भांडवलशाही' सोडता अन्य सर्व संप्रदायांना तो मान्य होण्यासारखा आहे.) तो सार्वकालिक आहे; सार्वस्थानिक आहे; सार्वजनीन आहे. पृथ्वीवरच्या सर्व मानवांसाठी तो आहे. 'हिंदू' ह्या विशेषणामुळे त्याला उगीचच एक संकुचितता, रंग प्राप्त होतो असं मला वाटतं. मला तो मुळीच अभिप्रेत नाही; तथापि, नाइलाजानं, तेच विशेषण मला वापरावं लागलेलं आहे.

ह्या पुस्तकाला 'पार्यावरणिक हिंदुत्वा'ची मर्यादा मी जाणीवपूर्वक घालून घेतलेली असल्यानं, हिंदू संप्रदायातील आज विवाद्य बनलेल्या चातुर्वर्ण्य, जातीयता, इ. कोणत्याच बाबींचं विवेचन ह्या पुस्तकात नाही. आज सर्व जग सहाव्या महाविनाशाकडे वेगानं जात असताना बाकी सारे विषय, समस्या तात्पुरत्या बाजूला ठेवून, निसर्गाची धारणा कशी होईल, आणि मानव-प्रजातीचा विनाश न होता ती टिकून कशी राहील, हे पाहणं हे मनुष्यमात्राचं प्राथमिक कर्तव्य आहे. हिंदू तत्त्वज्ञान, जीवनविचार, जीवनशैली ही सारी ही ह्या धारणेच्या दृष्टीनं योग्य मार्ग दाखवतात असं दिसल्यानं, ते सर्व समाजापुढे ठेवण्यासाठी हे लेखन आहे.

* * *

मी माझ्या पुस्तकांचा केवळ 'लेखक' नसतो : 'मांडणीकार'ही असतो. त्यासाठी आवश्यक चित्रं; किंवा मुखपृष्ठ माझे चित्रकार मित्र गिरीश सहस्रबुद्धे हे पुस्तकाचा विषय, आणि माझी सजावटीची कल्पना हे दोन्ही समजून घेऊन छान तयार करतात. 'हिंदुत्वातली प्रतीकं आणि वैशिष्ट्यं ह्यांवर आधारित रांगोळी-शैलीतली चित्रं आपण वापरू शकू का' ह्या माझ्या प्रश्नाचं उत्तर त्यांनी त्वरित तशा चित्रपट्ट्या तयार करूनच दिलं. मुखपृष्ठावर, त्याच शैलीतलं, 'कासव' हे 'हरित हिंदुत्वा'चं प्रतीक मला हवं होतं. ते वापरून त्यांनी छान मुखपृष्ठही तयार केलेलं आहे.



* * *

सध्याचं भरकटलेलं हिंदुत्व नाकारत, निसर्गरक्षणासाठी उपयोगी ठरणाऱ्या मूळ हिंदुत्वाची युगानुकूल मांडणी करणारं, आणि त्याच्या आचरणाचा आग्रह धरणारं हे पुस्तक आहे. ते वाचून 'हरित हिंदुत्वा'चं आचरण प्रत्येकाकडून घडो, नि त्यातून खऱ्या अर्थानं विश्वगुरू असणारं हिंदुराष्ट्र साकार होवो, ही सदिच्छा.

**दिलीप कुलकर्णी**
८६९८१९५०७६

# विज्ञान जगतातील ‘राजहंसी’ विविधा




जागतिक दर्जाचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उमटलेल्या मूळ हिंदी पुस्तकाचा सुबोध, रसाळ मराठी अनुवाद.

## ताऱ्यांची जीवनगाथा

डॉ. जयंत नारळीकर

अनु. : डॉ. पुष्पा खरे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १६०/- । (ट.ख. ₹ ५०)


पृथ्वीच्या रंगमंचावर रंगले एक महानाट्य, साडेचार अब्ज वर्षांपूर्वी. या महानाट्यातील आगळीवेगळी सजीव पात्रे म्हणजे रेणूंचे अत्यंत सुसंघटित सहकारी संघ. या पात्रांनी साकारलेले...



## उत्क्रांती : एक महानाट्य

माधव गाडगीळ

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)




आजच्या विज्ञानाच्या पायावर भविष्यातील विज्ञानकल्पनेचा महाल उभारणाऱ्या - मानवी भावभावनांचा, परस्परसंबंधांचा वेध घेणाऱ्या - उत्कंठावर्धक, चित्तथरारक अन् रंजक विज्ञानकथांचं सप्तरंगी इंद्रधनुष्य!

## मिरॅकल

डॉ. सुनील विभुते

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

## मराठी मनाच्या सर्जनशीलतेला पाऊलवाट देणारे सदर

### माझी एकुलती

माझी ही काळी डायरी
पानांनी भरली आता...
खूपशा कहाण्यांनी...
काही ओल्या चित्रांनी...
काही संध्याकाळी न गाईलेल्या गीतांनी !

काही ओथंबलेल्या पावसाच्या
काही वाहून गेलेल्या
काही बांध घातलेल्या...!
काही बांध फुटलेल्या...
प्रवाहासोबत... प्रवाहाविरुद्ध ...
एक आध्यात्मिक प्रवास !

गाणी भिजलेल्या पावसाची...
डोक्यावरुन ओघळणाऱ्या धारा...
गालावरचे अनमोल मोती...
सरीवर कोसळणाऱ्या सरी
संगम... आभाळाच्या मायेचा...
आणि मातीमधल्या आशेचा...!

काळ्या खडकांवर
विध्वंसक... कोरीव... आवेगाने
आदळणाऱ्या लाटांच्या
कधी न जिंकलेल्या...
चढाया-लढाया... पराभूत योद्ध्याच्या
पराक्रमाची अदृश्य कहाणी...!

आश्वस्त, खांद्यावर झुकणारी...
कोवळी, मुलायम हिरवी
लडिवाळ गुंतल्या केशी
निष्पाप, दाटल्या छायेमधली
सलगीने गालाचा मुका घेणारी
अबोल, गुलाबी, उमलती कळी...

काही ओली निसर्गचित्रं
निळ्या नवलाईत दडलेल्या
आकाशात विहरणाऱ्या पक्षिणी...
मावळता सूर्य... पसरता अंधार

ओहोटीचा समुद्र...
कानावर सॅक्सोफोनचे सूर !

कधी डोकावतं... मोरपीस...
मधल्या पानी, खुणेसाठी
खोचलेलं... कधी एक
पाकळी गुलाबाची...
गुदगुल्या करणाऱ्या
वेड्या साहसाची... आठवण...!

कधी सूर उमटतात
निसर्गात सामावणारे
शुद्ध संपूर्ण यमन कल्याण...!
शुद्ध भावना, शुद्ध स्वरांच्या
केवळ एक... मध्यम तीव्र
बाकी सगळे एका बाजूला!

**राजीवलोचन श्रीधर पुंडलीक**
९९२३७५६६४८



आर. डी. बर्मन यांच्या समृद्ध संगीताची वैशिष्ट्यं आणि त्यांच्या निवडक २५ चित्रपट-गीतांचं रसग्रहण यांतून चित्रपट व संगीत अभ्यासक सुहास किर्लोस्कर यांनी घेतलेला आर. डी. यांच्या संगीताचा हा रसिक शोध...



आर. डी. बर्मन
सिनेसंगीतातील जीनियस पंचम

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)




'वरवर सुखवस्तू, स्थिर आणि सुरक्षित भासणाऱ्या मध्यमवर्गीयांना भूकंपसदृश धक्का देऊन सामूहिक आत्मपरीक्षण करायला लावणारं नाटक!'
*- संपादक व माजी राज्यसभा सदस्य, कुमार केतकर*

भूमिका

क्षितिज पटवर्धन

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

## निवडक शकुंतला परांजपे

*पुणे शहराच्या मातीलाच सात्त्विक गुणांचा सुगंध आहे. खूप मोठी सामाजिक-सांस्कृतिक परंपरा लाभलेले पुणे शहर ओळखले जाते ते तेथील प्रज्ञावंतांच्या अद्वितीय कार्यामुळे. संततिनियमनाचे पायाभूत कार्य करणाऱ्या लेखिका व नाटककार शकुंतला परांजपे यांच्या एकूण लिखाणाचा वेध घेणारे 'निवडक शकुंतला परांजपे' या पुस्तकाचा थोडक्यात परामर्श...*

## बंडखोर तरीही विनोदाची राणी... शकुंतला परांजपे

स्त्रियांच्या भोवताली अनेक प्रश्न असतात कधी धर्माचे तर कधी तिच्या वैवाहिक जीवनाचे... शकुंतला परांजपे यांनी मात्र अनेक पाशांचं अस्तित्व नाकारलं होतं.. रँग्लर परांजपे या सुधारक वडिलांच्या घरात त्यांचा जन्म झाला. पुढे परदेशात जाऊन केंब्रिजची ट्रॉयपॉस परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. त्या काळी 'रँग्लर' ही बहुमानाची पदवी केवळ पुरुषांसाठी होती... नाहीतर शकुंतलाबाईंनादेखील ही उपाधी असती. रूढींनी ग्रासलेल्या समाजात परिवर्तन आणण्यासाठी त्यांनी आपलं आयुष्य वाहून घेतलं. रूढींचा त्रास त्यांना व्हायचा का... तर माझ्या मते नक्कीच होत असे. पण त्यांनी तो कधी मानलाच नाही. तर इतर स्त्रियांवर लादलेले अनावश्यक नियम व रूढी यातून त्यांची सुटका व्हावी यासाठी त्यांनी विपुल लेखन केलं. त्यांचं इंग्रजीतील 'सेन्स अँड नॉनसेन्स' हे पुस्तक म्हणजे त्याचाच एक भाग होय. त्यांच्या काळी स्त्रीशी वागण्याची समाजाची रीत शकुंतलाबाईंच्या लेखनात अगदी निर्हेतुकपणे आली आहे. तुम्ही त्यांचं फक्त 'निवडक शकुंतला परांजपे' वाचा. त्यावरून तुम्हाला त्यांच्या स्वच्छंदी, संवेदनशील आणि तेवढ्याच विनोदी स्वभावाचा अंदाज येईल. 'माझी प्रेतयात्रा' या लेखात स्वत:ला दिसलेल्या प्रेतयात्रेच्या शोकसभेचं गमतीदार वर्णन शकुंतलाबाई करतात. या लेखातून त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीचा नेमका अंदाज बांधता येतो. या लेखाची शैली ओघवती असली आणि विनोदी बाज असला.

तरी त्यामागे भावनांची केवढी गुंतागुंत आहे, स्त्रीच्या भोवती आवळलेल्या नियमांची चौकट किती घट्ट आहे हे लक्षात येतं.

मनमोकळ्या स्वभावाच्या शकुंतलाबाई कधीही कुणाशी तडजोड करत नाहीत. त्या काळी सुरुवातीला त्यांनी प्रभातच्या सिनेमांतून काम केलं... त्यावर 'ते काही फार विशेष नव्हतं' असं त्या सहज सांगतात... शकुंतलाबाईचं भाग्य केवढं थोर की त्या आठ-नऊ वर्षांच्या असतानाच हरी नारायण आपटे यांनी 'भासकवीच्या नाटककथा' हे पुस्तक त्यांना अर्पण केलं. पुढे याच शकुंतलाबाई थोर विदुषी झाल्या... संततिनियमन हेच आपलं ध्येय मानलं. राज्यसभेच्या खासदार झाल्या. त्यांना पद्मभूषण मिळालं! आपले वडील रँग्लर परांजपे आणि मुलगी सई परांजपे या दोघांची व्यक्तिचित्रं वाचावीत ती केवळ शकुंतलाबाईंकडूनच. सईला त्या प्रेमाने 'स्वारी' म्हणत. या तिघांची एकमेव आठवण म्हणजे 'पुरुषोत्तमाश्रम' हा बंगला होय. सईताईंच्या भेटीच्या निमित्तानं मी अनेकदा तिथे जात असे. बंगल्यावर व भोवताली मी निरखून नजर फिरवत असे. त्या क्षणी मला हे तिघंही एकमेकांशी बोलत असल्याचा भास होत असे. यातील चित्रकथा व व्यक्तिस्मरणं अनेकदा त्यांच्या साहित्यातून वाचायला मिळतात. 'घराचा मालक' हे पुस्तक म्हणजे त्याचं बोलकं चित्र आहे. शकुंतलाबाई लोकमान्य टिळक व गोपाळराव जोशी यांच्याशीही नातं सांगतात. त्यांची आई ही गोपाळराव जोशी यांची पुतणी. महर्षी कर्वे व रँग्लर परांजपे हे सख्खे आतेमामेभाऊ. त्यामुळे ओघानेच र. धों. कर्वे यांचं कार्य बाईंनी पुढे नेलं. काळाच्या कितीतरी पुढे विचार करणाऱ्या या क्रांतिकारी सामाजिक कार्यकर्त्या होत्या.

अभिनेत्री, नाटककार, लेखिका अशा कित्येक उपाध्यांनी त्या आपल्याला विविध रूपांत भेटतात. विनोद हा तर त्यांचा स्थायिभावच होता. राजहंसनं त्यांच्यावर केलेलं 'निवडक शकुंतला परांजपे' पुस्तक म्हणजे वाचकांसाठी मनमोकळ्या गप्पा आहेत.




संततिनियमनाचे पायाभूत कार्य करणाऱ्या समाजकार्यकर्त्या.
प्रख्यात नाटक-चित्रपटकर्त्या सई परांजपे यांची आई!
या पुस्तकातून दिसतात वेगळ्याच शकुंतलाबाई -
विविधछंदी, पशुप्रेमी, विचारवंत!
त्यांच्या गमतीदार कहाण्या वाचाच...

निवडक **शकुंतला परांजपे**

संपादक : विनया खडपेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

संपादक विनया खडपेकर म्हणतात, 'त्यांचा काळ मागे पडला असला तरीही हे लिखाण वाचकांना आकर्षून घेणारं आहे.' सई परांजपे यांच्या सहवासातून कित्येकदा मला स्वत:ला शकुंतलाबाई भेटतात. कुठेही प्रकाशित न झालेले अनेक किस्से मी ऐकलेत. शकुंतलाबाई हे न उलगडणारं गोड कोडं आहे. तुम्ही जेवढं त्याच्या मुळाशी जाल. तेवढे तुम्ही समृद्ध नक्कीच व्हाल.. या पुस्तकाच्या अखेरीस विनया खडपेकर यांनी घेतलेली शकुंतला परांजपे यांची मुलाखतदेखील खूप बोलकी आहे.. आवर्जून वाचावं असं हे पुस्तक आहे.

***स्वप्निल जोशी***

(*दैनिक दिव्य मराठी,* दिनांक २१ डिसेंबर २०२५मधून साभार)

---

## युद्ध नाकारणारे जग

*'युद्ध नाकारणारे जग' या पुस्तकाच्या निमित्ताने लेखक, आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक डॉ. संदीप वासलेकर यांच्याशी साधलेला संवाद. मुलाखत आणि शब्दांकन दैनिक लोकमतचे सहायक संपादक दुर्गेश सोनार यांनी केले आहे.*

१९३पैकी २२ देशांकडे सैन्यच नाही, तरी त्यांच्यावर कधीही हल्ले झालेले नाहीत. दोन तृतीयांश जग युद्धविरोधी आहे, ही वस्तुस्थितीच आपल्याला माहीत नाही.

*'युद्ध नाकारणारे जग' या पुस्तकाची कल्पना कशी सुचली?*

'अ वर्ल्ड विदाउट वॉर' या माझ्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा डॉ. परिमल माया सुधाकर यांनी केलेला मराठी अनुवाद 'युद्ध नाकारणारे जग' या शीर्षकाने राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकाची कल्पना जून २०१९मध्ये रुजली. त्या वेळी आम्ही सहा जणांनी मिळून 'नॉर्मडी मॅनिफेस्टो फॉर वर्ल्ड पीस' हा जाहीरनामा सादर केला. यात शांततेचे चार नोबेल पारितोषिक विजेते, ब्रिटनमधील एक नामवंत तत्त्ववेत्ता आणि मी होतो. या चर्चांमधून एक गोष्ट ठळकपणे जाणवली ती ही की, जगावर युद्धाचा धोका आहे; पण तो आपल्याला रोजच्या बातम्यांत स्पष्टपणे दिसत नाही. दैनंदिन जीवन सुरळीत असले, तरी मानवी संस्कृतीसमोर अतिशय गंभीर संकट उभे आहे. ऑक्टोबर २०१९मध्ये महात्मा गांधीजींच्या १५०व्या जयंतीनिमित्त ऑक्सफर्ड विद्यापीठात व्याख्यान देताना या विचारांचा विस्तार करण्याचा आग्रह झाला. कोविड काळात मिळालेल्या निवांत वेळेत झालेल्या चिंतनातून हे पुस्तक साकार झाले.

*पुस्तकातील मध्यवर्ती सूत्र कसे विकसित झाले?*

मी जगभरातील विचारवंत, राजकीय नेते, अभ्यासक यांच्याशी सखोल चर्चा केली आणि त्यातून हे लक्षात आले की, जागतिक महायुद्ध ही केवळ काल्पनिक शक्यता नाही. ते कधीही होऊ शकते. अणुयुद्ध झाले तर पृथ्वीवरील सृष्टीच नष्ट होण्याची शक्यता आहे. मग यातून बाहेर कसे यायचे... त्यासाठी काय काय बदल करायला पाहिजेत, याचा साकल्याने विचार केला. एकीकडे राजकीय व धार्मिक अतिरेकी विचार तीव्र होत आहेत, तर दुसरीकडे एआयमुळे अधिकाधिक स्वयंचलित होत चाललेली शस्त्रास्त्रे आहेत. या दोन्हींचे मिश्रण अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळेच या पुस्तकात मी युद्धाच्या शक्यतेचे आणि त्यामागील कारणांचे विश्लेषण केले आहे, तसेच त्यातून बाहेर पडण्याचे ऐतिहासिक व तात्त्विक मार्गही मांडले आहेत.

*युद्ध नाकारणाऱ्या जगाच्या उभारणीत सामान्य लोकांची ठोस भूमिका असू शकते का?*

नक्कीच असते. मागच्या ५० वर्षांत शस्त्रास्त्रांची स्पर्धा कमी करण्यामध्ये आणि युद्ध थांबवण्यामध्ये सामान्य लोकांचा खूप मोठा सहभाग होता. गंमत म्हणजे त्यांनाच हे माहीत नाही. मागील ५० वर्षांत सामान्य नागरिकांनीच अनेक ऐतिहासिक बदल घडवून आणले आहेत. भूसुरुंगविरोधी जागतिक करार असो वा अण्वस्त्रविरोधी चळवळी. या सर्वांचे नेतृत्व सत्ताधाऱ्यांनी नव्हे, सामान्य स्त्री-पुरुष, अभ्यासकांनी केले. विशेष म्हणजे जगातील १९३ देशांपैकी २२ देशांकडे सैन्यच नाही, तरी त्यांच्यावर कधीही हल्ले झालेले नाहीत. दोन तृतीयांश जग युद्ध नाकारणारे आहे, ही वस्तुस्थितीच आपल्याला माहीत नाही.




युद्धाला द्यायला हवा ठाम नकार... या पुस्तकात आहे - युद्धांमागील राजकारण, प्राणघातक शस्त्रास्त्रांच्या शर्यती, अतिरेकी राष्ट्रवादाचे दुष्परिणाम यांसह युद्ध आणि शांतता यांचा सम्यक विचार. तसेच आंतरराष्ट्रीय मुत्सद्दीगिरी, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांचा युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने घेतलेला परामर्श...

**युद्ध नाकारणारे जग**

संदीप वासलेकर । अनुवाद : डॉ. परिमल माया सुधाकर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

*युद्धनीतीचा मुळातून फेरविचार व्हायला हवा असे वाटते का?*

होय. सुमारे १५० देशांना युद्ध नको आहे; संघर्ष फक्त ३०-४० देशांत केंद्रित आहेत. दुर्दैवाने अलीकडच्या काळात काही युरोपीय राष्ट्रेही पुन्हा युद्धखोर झाली आहेत. युद्ध अपरिहार्य नसते. अलिप्ततावाद आणि शांततावादी धोरणांमुळे अनेक संघर्ष टाळता येतात. पौर्वात्य तत्त्वज्ञान 'वसुधैव कुटुंबकम' याच सूत्राभोवती गुंफलेले आहे. परंतु, पाश्चिमात्य देशांमधील तत्त्वज्ञान हे केवळ 'स्वातंत्र्य' या कल्पनेभोवती बेतलेले आहे. आपण आपले तत्त्वज्ञान केवळ घोषणा देण्यासाठी वापरतो. सांस्कृतिक दुरभिमान म्हणून नाही, पण पौर्वात्य देशांचे तत्त्वज्ञानच जगाला दिशा देऊ शकते.

*भारत युद्ध टाळणारे सक्षम असे जागतिक मॉडेल उभे करू शकतो असे वाटते?*

आपल्याला महान राष्ट्र व्हायचे आहे, अशी ज्या वेळी कल्पना केली जाते, तशी महत्त्वाकांक्षा जन्म घेते तेव्हाच तो देश पुढे येतो. पण, महासत्ता होण्याचे डोहाळे लागले, तर देशाचा विकास होत नाही. त्यामुळेच भारताने सर्वप्रथम एक महान राष्ट्र बनण्याची आस धरली पाहिजे, महासत्ता बनण्याचा विचार बाजूला ठेवला पाहिजे. सर्वसामान्य माणसाचे जीवन सुखी, सुरक्षित आणि सन्मानाचे झाले, तर देश आपोआपच मजबूत होतो.

*एआयच्या युगात 'युद्ध नाकारणे' अधिक अवघड झाले आहे का?*

सायबर, ड्रोन यांची मला फारशी काळजी वाटत नाही; पण कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मानवी नियंत्रण सुटण्याचा धोका वाढला आहे. एआयची क्षमता पाहता येत्या ५ वर्षांत एआय स्वत:च युद्ध लावेल. आण्विक युद्ध करू शकेल आणि सर्व जगाचा सर्वनाश करू शकेल. यासाठी जागतिक पातळीवर तातडीने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

*(दैनिक लोकमत, दिनांक १० जानेवारी, २०२६मधून साभार)*

❖



ज्ञानाची क्षितिजे, नीतिमत्तेच्या चौकटी,
वैद्यकसत्ता अन् मानवी प्रवृत्ती या साऱ्यांचा वेध घेणारी
अमर्त्य पेशींची खरीखुरी कहाणी...

'हेला'पेशी


कहाणी अमर्त्य पेशीची

वंदना अत्रे । शोभना भिडे

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)



# ‘राजहंसी’ विविधा



पृथ्वीवरील खनिजसंपत्ती वाहून नेण्याचे व्यापारी मार्ग फक्त युरोप-अमेरिकेच्या ताब्यात हवेत, ही आजची अटीतटी मोठी आहे. त्यासाठी पाश्चात्त्य सांस्कृतिक संस्था, गुप्तचर यंत्रणा आणि शस्त्रलॉबी एकत्र काम करतात. व्यापारी मार्गावरील देशांना मांडलिक बनवण्याच्या नादात युद्धाचे वणवे पेटवून देतात. मध्यपूर्वेतील अशा युद्धकहराची ही गोष्ट!

## वावटळ पेराल, तर वादळच उगवेल!

मिशाएल ल्यूडर्स । अनु : वैशाली करमरकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)



गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच ‘दिगमा’ या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

## पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर



दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

## वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट.ख. ₹ १००)

# गौरव 'राजहंस' प्रकाशन संस्थेचा



डावीकडून : नंदकुमार सावंत, प्रा. मिलिंद जोशी, दिलीप माजगावकर, विनोद कुलकर्णी

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच सातारा येथे संपन्न झाले. मराठी साहित्य क्षेत्रात वैविध्यपूर्ण, आशयसंपन्न व दर्जेदार साहित्यनिर्मिती करणाऱ्या राजहंस प्रकाशनाचा आणि राजहंसचे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर यांचा अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या वतीने या निमित्ताने सन्मान करण्यात आला.

सजग सामाजिक जाणीव, वैचारिक मोकळेपण, निरनिराळ्या राजकीय आणि सामाजिक चळवळींबद्दल आस्था बाळगत 'राजहंस' प्रकाशन गेली ७३ वर्षे विविध प्रेरणादायी चरित्रे-आत्मचरित्रे, राजकीय व ऐतिहासिक विषयांवरील व समाजकारणावरील प्रभावी पुस्तके, सकस ललित लेखन सातत्याने प्रकाशित करीत आहे. या सन्मानाने 'राजहंस'च्या या सामाजिकतेचाच गौरव झाला आहे.

❖

# ‘राजहंसी’ विविधा



देशविदेशातील असंख्य कलाकारांनी आपापल्या कलांतून छत्रपती शिवाजी महाराज घडवले. त्या कलाविष्कारांमागील संघर्षकथाही तितक्याच लक्षणीय. अशा असंख्य कथांचे आणि तशाच व्यथांचे हे अनोखे संकलन म्हणजे इतिहास, चित्रकला आणि शिल्पकला या तिन्ही क्षेत्रांतील असंख्य मान्यवरांच्या अतुल कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदनाच आहे!

## कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

सुहास बहुळकर

किंमत : ₹ १०००/- । सवलतीत : ₹७५० । (ट.ख. ₹ ८०)
सवलत मुदत ३१ मार्च २०२६


मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत, या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे, मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

## आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)






सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीचे अंतरंग, तिचे आजतागायत सुरू असलेले बदल आणि त्याला कारणीभूत घटक यांची रंजक आणि सुबोध शास्त्रीय मांडणी...!

## शोध बदलत्या पृथ्वीचा

सतत बदलत्या भूगर्भीय घडामोडींचा वेध

सुनीत पोतनीस

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा,*
*तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू.*
*प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

'कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या' हा उत्कृष्ट, दर्जेदार ऐतिहासिक ग्रंथ सिद्धहस्त लेखक सुहास बहुळकर यांनी लिहिला व आपण प्रकाशित केला. ही सर्व शिवप्रेमींसाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यासाठी आपले अभिनंदन. महाराजांचे चरित्र अनेकांनी लिहिले; पण सुहास यांनी केलेला हा विचार कोणासही उमगला नाही. कदाचित त्यांना माहीत नसेल, अनुभवले नसेल वा सुचलेही नसेल. प्रत्येक इतिहासकारांनी, चित्रकारांनी, शिल्पकारांनी तसेच या क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचावा असा हा अभ्यासपूर्ण ग्रंथ आहे. ग्रंथाच्या शेवटी या स्वप्नातील शिवस्मारकांमध्ये त्यांनी मांडलेले मौलिक विचार स्पृहणीय आहेत. ग्रंथात श्रद्धेय महाराजांच्या संबंधित चित्रांच्या तसेच शिल्पांच्या निर्मितीच्या कथा फारच अभ्यासपूर्णरीत्या उतरल्या आहेत.

चित्र कसे पाहावे, शिल्प कसे पाहावे, त्या कलाकाराने किती बारकाईने याचा अभ्यास करून साकार केले आहे याची प्रचिती हे पुस्तक वाचताना येते. हे खरे रसग्रहण आहे. अनेक कलाकारांनी महाराजांची असंख्य चित्रे - शिल्पे केली. याचे सविस्तर वर्णन त्या कलाकारांचे लेख, रोजनिशी, व भेट यांतून सुहास यांनी सविस्तर मांडले आहे. शिल्पकारांना आलेले चांगले - वाईट अनुभव वाचताना त्यांना किती दिव्यातून जावे लागले असेल याची कल्पना येते. सुहास यांनी यासाठी घेतलेले श्रम सर्वसाधारणपणे कोणासही शक्य झाले नसते. एकंदरीत निश्चितच एक अनमोल ग्रंथ वाचकांसाठी राजहंसने उपलब्ध करून दिला आहे. आनंद हर्डीकर यांचेही याबद्दल अभिनंदन.


**रवीन्द्र उबेरॉय**
कोल्हापूर

# वसुंधरेचे शोधयात्री

डॉ. अनुराग लव्हेकर लिखित 'वसुंधरेचे शोधयात्री' या अनेक पुरस्कारप्राप्त साहित्यकृतीबद्दल काय जाणवले, समजले आणि भावले ते इथे लिहिण्याचा हा प्रयत्न आहे.

'वसुंधरेचे शोधयात्री' हे शीर्षकच वाचकाची हे पुस्तक वाचायची उत्सुकता चाळवते. लेखकाला 'पृथ्वी' हा शब्द वापरता आला असता कारण या पुस्तकाचा विषय तोच तर आहे. पण 'वसुंधरा' या शब्दात कमालीचे सौंदर्य, मार्दव व निखळ स्त्रीत्व ध्वनित होते आणि स्त्रीत्वाच्या असंख्य, अगम्य कंगोऱ्यांसारखी पृथ्वीच्या असंख्य प्रदेशांची शोध'यात्रा'! याही शब्दात पुस्तकाच्या विवेचनाचे गांभीर्य सामावले आहे. विनोदाने म्हणायचे तर, यात्रा म्हणजे 'यातना' व 'त्रास' असलेला प्रवास! विनोदाचा भाग सोडला तर कोणताही प्रवास ज्यात आत्मक्लेश, मग ते शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा सामाजिक असोत, समाविष्ट आहेत; त्याच प्रवासासाठी 'यात्रा' हा शब्द वापरला जातो. या पुस्तकात समाविष्ट असलेली प्रत्येक व्यक्ती असंख्य अडचणी व क्लेशांमधून ध्येयापर्यंत पोहोचली आहे, म्हणूनच या समर्पक शीर्षकाविषयी लिहावेसे वाटले. त्याबद्दल लेखकाला मनापासून शाबासकी द्यायला हवी.

या पुस्तकात काय लिहिले आहे त्यापेक्षाही ते कसे लिहिले आहे ते मला जास्त महत्त्वाचे वाटते. डॉ. लव्हेकरांचीही ही एक 'यात्रा'च म्हणावी लागेल. विषय समजून घेऊन, त्याचा सर्वंकष अभ्यास करून तो समर्थपणे मांडणे हे एका तपस्येप्रमाणे आहे. आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून हा ध्यास जोपासणे कौतुकास्पद आहे. आपल्याला शिकवलेल्या इतिहासात अमुकतमुकाने या खंडाचा शोध लावला, या या नोंदी करून ठेवल्या इतपतच आपले आकलन होते. पण या नोंदींचे अमूल्यपण



'भूगोलाच्या रंगमंचावर इतिहासाचे नाट्य सादर होत असते.' या विधानाची प्रचिती देणाऱ्या - आपल्या शोधयात्रांमधून नवा इतिहास घडवणाऱ्या शोधनायकांची गाथा.

**वसुंधरेचे शोधयात्री**

डॉ. अनुराग लव्हेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

हे पुस्तक वाचल्यानंतर यथार्थपणे लक्षात येते आणि त्या त्या व्यक्तीने तिथपर्यंत पोहोचण्यासाठी कोणकोणत्या समस्यांना तोंड दिले ते वाचल्यावर तर त्यांच्याबद्दल, त्यांच्या ध्यासाबद्दल, अथक प्रयत्नांबद्दल आणि चिकाटीबद्दल त्यांच्याप्रति नतमस्तक व्हायला होते. या आपल्या भावानुभूतीचे श्रेय लेखकाच्या ओघवत्या शैलीला, विविध विषयांच्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीला आणि तपशीलवार वर्णनाला द्यावे लागेल. या पुस्तकात समाविष्ट असलेल्या प्रत्येक व्यक्तींचे देश वेगळे, अडचणींचे स्वरूप वेगळे, त्या उभ्या करणाऱ्या व्यक्ती वेगवेगळ्या, त्या समस्यांवर मात करण्यासाठी योजलेले उपाय, घेतलेली मदत वेगवेगळी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी शोधून काढलेली वसुंधरेची वैशिष्ट्येही वेगवेगळी! हे सर्व लेखकाने खूप छान पद्धतीने वाचकांपर्यंत पोहोचवले आहे. पानागणीक माहितीत अमूल्य भर पडत जाते. वाचताना कुठे कंटाळवाणेपणा तर येत नाहीच, तर पुढे काय याची उत्सुकता निर्माण होते व पुढे वाचतच जावे वाटते. आपण केलेल्या प्रयत्नांचे आणि साध्य केलेल्या कार्याचे समाजाकडून कौतुक व्हावे, किमान त्यामागच्या कष्टांची जाणीव व्हावी असे असामान्य काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वाटत असते, वसुंधरेच्या या शोधयात्रींनाही तसे वाटत असावे आणि आज ते जिथे कुठे असतील तेथे त्यांना हे पुस्तक वाचणाऱ्या असंख्य वाचकांच्या अनुभूतीतून ते पोहोचत असावे. या कलाकृतीबद्दल लेखकाचे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा!

***डॉ. भावना जोशी***
छत्रपती संभाजीनगर

**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील व मलपृष्ठावरील पुस्तकांविषयी...**

- सयसंगत — किंमत : ₹ २५०/-
  सई परांजपे
- कोरोनायन — किंमत : ₹ ६५०/-
  डॉ. राजेंद्र मलोसे
- धुळाक्षरे ते शल्यकौशल्य — किंमत : ₹ ३५०/-
  डॉ. ज्ञानेश्वर दुसाने
- सुमन कल्याणपूर — किंमत : ₹ २००/-
  अपर्णा संत

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

Download on the App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

GET IT ON Google Play
ॲन्ड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com


## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ☎ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ☎ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ☎ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ☎ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ☎ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ☎ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ☎ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ☎ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ☎ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ☎ ९८२२८०७७१५.

त्यांच्याजवळ ना पैसा होता, ना कुणाचे पाठबळ.
हातावरचे पोट असलेले आईवडील अन् गरिबीच्या उन्हात उभे राहिलेले घर.
पण तो फक्त नावापुरता 'ज्ञानेश्वर' नव्हता.
आपल्या बुद्धिमत्तेला त्याने चिकाटीची धार चढवली.
विलक्षण जिद्द अन् अभ्यासाच्या सातत्यातून तो प्रख्यात 'शल्यविशारद' झाला.
हा अवघड वळणाचा प्रवास सांगणारी एका समर्पित सर्जनची संघर्षकहाणी....

**'धुळाक्षरे ते शल्यकौशल्य'**

डॉ. ज्ञानेश्वर दुसाने



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post


सुमनताई म्हणजे....
प्रेमळ, समजूतदार, शांत, समर्पित...
शांतपणे तेवणारा नंदादीपच जणू!

कोवळ्या नाजूक फुलांचा मंद सुगंध, पावसाची हलकीशी सर, झाडाची कोवळी पालवी, पानांवरील निर्मळ दवबिंदू - किती उपमा द्याव्यात या सुरेल व्यक्तिमत्त्वाला !


तरल, वत्सल, शुद्ध उच्चारांचं लेणं लाभलेला,
उत्तम पल्ला नि फिरत असणारा,
तरी अत्यंत भावपूर्ण... असा हा मधुर स्वर !

सुमन कल्याणपूर यांच्या मराठी व हिंदी गाण्यातल्या सांगीतिक वैशिष्ट्यांचा हा संस्मरणीय आढावा आणि त्यांच्याच निवडक २५ गाण्यांचं हे रसग्रहण - प्रसिद्ध गायिका अपर्णा संत यांच्या शब्दांत...

**सुमन कल्याणपूर**

सात्विक सुरांचा नंदादीप

अपर्णा संत





प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**